# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 4 | Marathi Monthly | Thane, Sunday , 1 October - 2023 to 31 October - 2023 | Pages 16 | Price : 10/-

# मराठा तरुणाईनं, अन्याय-अत्याचार-शोषणाविरुद्ध ठामपणे उभं राहिलं पाहिजे !!! - राजन राजे




**एक युवा ने राहुल गांधी से पूछा कि, ‘‘अगर आप सत्ता में आएंगे तो भारत के मुसलमान, जो मुल्क में अत्याचारों का आज सामना कर रहे हैं, उसे बदलने के लिए क्या करेंगे?’’ इसके जवाब में राहुल गांधी ने कहा, ‘‘आप सच कह रहे हैं, भारत में मुसलमानों पर हमले हो रहे हैं. ये शिकायत ग़लत नहीं है. लेकिन आपको ये भी समझना होगा कि, भारत में और भी लोग हैं, जिन पर हमले हो रहे हैं... मणिपुर में जो हो रहा है, चार महीनों से मणिपुर जल रहा है... आपको ये नहीं सोचना चाहिए कि, केवल मुसलमानों पर हमले हो रहे हैं... ये मुसलमानों, दूसरे अल्पसंख्यकों, दलितों और आदिवासियों के साथ भी हो रहा है!’’**

**त्या प्रश्नकर्त्या मुस्लिम युवकाला, राहुल गांधींनी दिलेलं वरील उत्तर, त्यांच्या अतिशय उच्चदर्जाच्या राजकीय समजेचा (नेहरु-गांधी घराण्याला शोभेशी राजकीय-समज) प्रत्यय देत असलं तरीही; मुस्लिम, आदिवासी, दलित-ओबीसी, विशेषत: सद्यस्थितीत जालन्यात ‘आरक्षणा’ऐवजी ‘लाठीमारा’चा प्रसाद मिळालेल्या ‘मराठा’ तरुणाईनं... निदान एवढं देशात ‘रामायण’ घडत असताना; तरी, आपली जातधर्मीय ओळख किंवा ‘आयडेंटीटी’, सध्याच्या अत्यंत खडतर कालखंडात पुसून टाकत, ‘देशाचा शेतकरी किंवा कामगार’ या दोहींपैकी एकाच ओळखीने, अन्याय-अत्याचार-शोषणाविरुद्ध ठामपणे उभं राहीलं पाहीजे!**


याचं कारण, मुसलमान-दलित यांच्यावर जातधर्म-विद्वेषातून होणाऱ्या अन्याय-अत्याचारांपेक्षा मोठ्याप्रमाणावर... खरे अत्याचार, खरं शोषण, खरा अन्याय... या देशात, प्रामुख्याने बहुसंख्य असलेल्या शेतकरी-कामगारवर्गावर होतोय. त्यातल्या त्यात, सर्वात भयंकर अन्याय-अत्याचार-शोषण होतंय... ते ‘कामगार’ या व्याख्येत मोडणाऱ्या; पण, प्रत्यक्षात ‘गुलाम व नव-अस्पृश्य’ असलेल्या ‘कंत्राटी-कामगारां’वरच (ज्यात, जगण्याच्या कोंडीमुळे ‘मराठा महामोर्चे’ काढाव्या लागलेल्या ‘मराठ्यां’चाच महाराष्ट्र-राज्यात प्रामुख्यानं समावेश आहे)!

**...दुर्दैव हे की, ही नौजवान-तरुणाई देशात संख्येने सर्वात मोठी असूनही, तिची ‘राजकीय-ताकद’ शून्य आहे आणि म्हणूनच, ‘डेमोग्राफिक-डिव्हिडंड’, या गोंडस-नावाखाली तिच्या जगण्यात टोकाची ‘असुरक्षितता’ निर्माण करुन, तिचं अमानुष-घृणास्पद शोषण राजरोस केलं जातंय. ही तरुणाई शिक्षित-अर्धशिक्षित व अलिकडे तर अगदी डॉक्टर्स, पत्रकार, तंत्रज्ञ (इंजिनिअर्स) यासारख्या पेशांमधली उच्चशिक्षित पांढरपेशीदेखील आहे. पण, परिपूर्ण ‘राजकीय-समजे’अभावी, ती अगदी चिडीचूप-मुकी बनून, आपापल्या घरात निष्क्रिय बसत कामाच्या ठिकाणी असलेल्या ‘कंपनी-दहशतवादा’विरुद्ध कडाकडा बोटं मोडण्यावाचून दुसरं काहीही करताना दिसत नाही.**

कालपर्यंत ‘निळ्या-कॉलर’वाल्यांच्या गळ्यात नोकरीचे ‘कंत्राटी-पट्टे’ दिसत होते... जसं धान्य, शेतातून पोत्यात, पोत्यातून सुपात आणि सुपातून जात्यात ‘दळण’ म्हणून दळायला शेवटी येतंच, तसंच ‘पांढरे-कॉलर’वाल्या उच्चशिक्षितवर्गाच्या गळ्यात देखील, हे असुरक्षितता व शोषणग्रस्ततेचे ‘कंत्राटी-पट्टे’ आलेत. ..*(पान क्र. ४ वर)*

## ठाणे जिल्ह्यात क्रांतिकारक घटना!

### ‘धर्मराज्य पक्षा’ने केली सेंद्रीय पद्धतीने ऊसाची शेती व गुळाची निर्मिती



**संपूर्ण ठाणे जिल्ह्यात निसर्ग-पर्यावरण संरक्षण-संवर्धनाबाबत अतिशय दक्ष असणाऱ्या व भारतातील पहिलावहिला नोंदणीकृत हरित पक्ष असलेल्या ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे प्रथमच (ता. मुरबाड, मौजे-साखरे) नैसर्गिक वा सेंद्रिय पद्धतीने ऊसाची केलेली शेती आणि पूर्णत: ‘रसायनमुक्त’ वा सेंद्रिय पद्धतीने ऊसाचं ‘गुऱ्हाळ’ चालवून जागीच केलेली ‘गुळा’ची निर्मिती... ही, शेतीविषयक एक ऐतिहासिक व ठाणे जिल्ह्यासाठी क्रांतिकारक घटना होय !!!**

...*(पान क्र. २ वर)*

## भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९६६ साली मिझोरामवर, हवाईदलाला ‘बॉम्बफेक’ करायचा आदेश कुठल्या परिस्थितीत दिला होता...???



पंतप्रधानपदी बसल्यानंतर केवळ तिसऱ्याच महिन्यात मिझोरामचा उग्र प्रश्न, अक्राळविक्राळ स्वरुपात इंदिरा गांधींसमोर उभा राहीला.

..*(पान क्र. ७ वर)*

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम, त्वरित अदा न केल्यास, 'धर्मराज्य पक्षा'चा आंदोलनाचा इशारा!



**ठाणे (प्रतिनिधी) : ठाणे जिल्ह्यात सुमारे १० हजार १८० उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन एससी, एसटी आदी मागासवर्गीय प्रवर्गातील २ लाख ८३ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी शिकत आहेत. यातील पात्र विद्यार्थ्यांना, गेल्या वर्षीची शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्काची रक्कम, महाविद्यालयांना अद्यापपर्यंत अदा करण्यात आलेली नसल्याने, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला असून, ठाणे जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्काची रक्कम, महाविद्यालयांना त्वरित अदा करण्यात यावी, अशी आग्रही मागणी, ठाण्याचे जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे यांच्याकडे एका लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील महाविद्यालयांसह, तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये २ लाख ८३ हजार ३३९ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतलेले आहे. यामध्ये तब्बल १लाख ३५ हजार ७०५ विद्यार्थिनी आहेत. या विद्यार्थ्यांमध्ये अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील १ लाख ७८ हजार १७१ विद्यार्थी असून, ८५ हजार ९०० विद्यार्थिनी आहेत. या मागासवर्गीयातील, पात्र विद्यार्थ्यांना गेल्या वर्षाची शिष्यवृत्ती व महाविद्यालयांना त्यांचे शैक्षिक शुल्क मिळालेले नाही.**

दरम्यान, निधीअभावी राज्य सरकारकडून, या शिष्यवृत्ती शैक्षणिक शुल्काच्या रकमा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात आजपर्यंत जमा झालेल्या नाहीत, ही बाब अत्यंत लाजिरवाणी असल्याची टीका, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्राद्वारे केली आहे. **केंद्र आणि राज्य सरकारकडून मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क शासनाकडून दरवर्षी मिळते; मात्र, गेल्या वर्षीच्या या रकमा आतापर्यंत मिळालेल्या नाहीत. शैक्षणिक वर्ष संपून, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल लागलेले असतानाही, निधीअभावी शिष्यवृत्तीची रक्कम मिळालेली नाही. तरी, याप्रकरणी प्रशासकीय स्तरावर, आपण महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करुन, ठाणे जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्काची रक्कम, महाविद्यालयांना त्वरित अदा करण्यात यावी, अशी आग्रही मागणी, जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आलेली असून, तसे न झाल्यास, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणविरोधी धोरणांचा निषेध म्हणून, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात शेवटी दिला आहे.**

## ठाणे जिल्ह्यात क्रांतिकारक घटना! *..(पान क्र. १ वरुन)*

**'भाताचं कोठार' (विशेषतः पूर्वीचा वाडा तालुका) वगैरे काही बाबी वगळता, आजवर ठाणे जिल्ह्यात शेतीविषयक फारसं उल्लेखनीय असं काही घडलेलं नाही. त्यामुळे, ठाणे ग्रामीण परिसरातील तरुणवर्ग शहरांमध्ये 'कंत्राटी-कामगार' म्हणून दाखल होताना, आजवर सर्वत्र आढळत आला.** आपल्या ठाणे जिल्ह्याच्या रक्तात-नसानसात ''एकमेका सहाय्ये करु, अवघे धरु सुपंथ'' हा सहकारितेचा जाज्वल्य मंत्र कदाचित कुणी रुजवायचा राहून गेला असावा किंवा ग्रामीण भागाच्या उशाला असलेल्या शहरी भागाची 'आर्थिक भूल' पडली असावी... की ज्यामुळे, आपल्याचं भूमितून बव्हंशी स्वेच्छेनं 'विस्थापित' होतं, मिळेल ती ('तुटपुंज्या' पगाराची का होईना) नोकरी-चाकरी पत्करत शहराच्या प्रदुषित 'कोंडवाड्या'त दाखल होणं... हा ठाणे भूमिपूत्र तरुणांसाठी जणू नियमच बनला! याच एका मोठ्या कालखंडात, ''आमच्या ग्रामीण भागातील मुलीसुद्धा, शेतकरी 'धनी' पत्करेनाशा झाल्या... कंत्राटी-कामगार चालेल; पण, खात्यापित्या घरचा शेतकरी मुलगा, लग्नाच्या बाजारात नकोसा व्हायला लागला''!

पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मात्र, याच्याबरोबर उलट, असं आशादायक चित्र आढळतं. आजही तेथील बरीच तरुणाई, आपल्या काळ्या आईच्या पदराला धरुन शेती-व्यवसाय करत आनंदाने जगते आहे. फक्त, दुर्दैवं हे की, तेथील बव्हंशी शेती ही, रासायनिक व यांत्रिक आहे व हे चित्र नजिकच्या भविष्यात बदलावं!

**आपल्या ठाणे जिल्ह्याला (विशेषतः, मुरबाड-शहापूर तालुक्याला), उदंड पावसाची शब्दशः 'बरसात' होऊनसुद्धा, पावसाच्या पाण्याची अडवणुकीची, मुरवण्याची व साठवणुकीची पुरेशी व्यवस्था नसल्याने (ठाणे जिल्ह्यात ग्रामीण भागात डझनावरी धरणं आहेत, ती फक्त इथली जंगलं नष्ट करुन केवळ शहरी भागाची कधिही 'न' संपणारी अगस्ती मुनींसारखी शहरांना लागलेली तहान भागवण्यासाठी बांधली गेली...** शिवाय, नव्या विनाशकारी धरणांचा घाट घातला जातोयं, तो वेगळाचं!) निसर्ग-पर्यावरणविरोधी अशा मोठ्या धरणांऐवजी हजारो शेततळ्यांचं जाळं वा गरजेनुसार छोट्यामोठ्या काँक्रिट वगैरेच्या पाणी साठवणुकीच्या टाक्या जर, या ठाणे जिल्ह्यात दूरदृष्टीने यापूर्वीच उभारल्या गेल्या असत्या; तर, आज आपल्याला दुबार शेतीसाठी वा ऊसासारख्या अक्षरशः पाणी पिणाऱ्या शेतीला, मुबलक पाणी मिळू शकलं असतं व कोरड्याठाक पडलेल्या पारंपारिक विहीरींनाही उदंड पाणी लागू शकलं असतं.

**आपल्या ग्रामपंचायती, उपलब्ध सरकारी 'अनुदाना'ला सामूहिक 'श्रमदाना'ची जोड देऊ शकल्या असत्या तर, खचितच चमत्कार घडला असता... आजही तो घडवता येणं, सहजशक्य आहे. फक्त, गरज आहे ती सकस-निरोगी, भ्रष्टाचारमुक्त स्वच्छ सामाजिक व राजकीय मानसिकतेची!**

या दिशेनं, पथदर्शक म्हणून काही करु शकता येईल का, या विचारप्रक्रियेतून सदरहू सेंद्रिय ऊसाच्या शेतीचा प्रयोग आम्ही हाती घेतला.... **मुरबाडची जमीन, पाणी व हवामान ऊसाच्या शेतीला अतिशय लाभदायक असल्याचं ध्यानात येताचं, पुढचं पाऊल आपसूकच उचललं गेलं, यात नवल ते काय? त्याची परिणती म्हणून यंदा वर्ष-२०१८मध्ये, ठाणे-जिल्ह्यात 'नवलाई' घडली... प्रथमच, ठाण्याच्या शिवारात 'सेंद्रिय गुळा'ची यशस्वी निर्मिती झाली! अर्थातच, याचा इथल्या साखरे-धारगाव-किसळ-साजगाव पंचक्रोशीतील समस्त गावकऱ्यांना साहजिकच खूप अभिमान व आनंद वाटला असणारच... तोच आनंद, ''तीळ, सात जणांत वाटून घ्यावा'', या भारतीय आध्यात्मिक विचारधारेनुसार वाटण्यासाठी आम्ही आपल्या दारी, हा सेंद्रिय शेतीचा 'प्रसाद' व सोबत आरोग्यदायक व निसर्ग-पर्यावरणपूरक जीवनशैलीचा 'सांगावा' घेऊन आलोयं!**

आपला सणासुदीचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी, घरक्रमांक पाहून ''प्रत्येक घरटी एक'' (मग, कुटुंबातील माणसांची संख्या कितीही कमीजास्त असो), याप्रमाणे एका छोटेखानी 'सेंद्रिय गुळा'च्या ढेपेचं आम्ही, निरपेक्षबुद्धीने वाटप करीत आहोत.... तेवढा ईश्वरी प्रसाद, कृपया 'गोड' मानून घ्यावा, ही नम्र विनंती !!!

## आता होऊया, सारे जागे... पर्यावरणीय महासंकटे लागली मागे ! पृथ्वी 'माता' आहे.... 'भोगदासी' नव्हे!!

पृथ्वी, 'जीवन' देण्यासाठी आहे.... प्रदूषणकारी 'उद्योग' उभारुन 'नोकरी' देण्यासाठी किंवा, यांत्रिक-रासायनिक 'शेती' करुन अब्जावधी जीवजिवाणूंची हत्या करणारी 'अनैसर्गिक' शेती करण्यासाठी नव्हे !!!

'निसर्गविरोधी विकास', हा 'विकास' नसून 'विनाश' आहे.... ''जल, जंगल, जमीन'' यांच्या सुरक्षेसोबतच 'जनसंख्या' आणि 'जीवनशैली' यांना कठोरपणे रोखा.... अन्यथा, अनाकलनीय व अकस्मात होणाऱ्या ''अनियंत्रित जागतिक हवामान-बदला''मुळे मानवी-अस्तित्वालाच धोका !!!

''प्रदुषण रोखणारी 'हिरवी झाडी' हवी की, कार्बनचा धूर ओकणारी 'गाडी'.... याचा, आता जगातल्या सर्वच शहरांना तातडीने निर्णय घ्यावा लागणार आहे !''

''नैसर्गिक जीवन व नैसर्गिक शेती.... मानवी अस्तित्वाची शाश्वती!''

.....राजन राजे कुटुंबिय आणि त्यांचा सर्व शेतीतही रमणारा व

कारखान्यांसोबत शेतीतही रुजलेला सहकारी कामगारवर्ग !!!

# शासकीय-निमशासकीय कार्यालयांतील 'कंत्राटी' नोकरभरतीच्या शासननिर्णयाला 'धर्मराज्य पक्षा'चा विरोध!

## शासननिर्णय रद्द न केल्यास, तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा...

**ठाणे (प्रतिनिधी) : राज्यातील विविध शासकीय-निमशासकीय कार्यालयांत, आवश्यक मनुष्यबळ (अधिकारी व कर्मचारी) बाह्ययंत्रणेच्या माध्यमातून (कंत्राटीपद्धतीने) भरण्यासाठी, नऊ संस्थांची नेमणूक करण्याचा, कामगार विभागाचा निर्णय, रद्द करण्याच्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनंतरही, या कंपन्यांना कायम ठेवण्याच्या हालचाली सुरु असल्याचे वृत्त मध्यंतरी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेले होते. भारतीय जनता पक्षाच्या एका आमदाराचे 'लाड' पुरविण्यासाठीच, हा खटाटोप सुरु असल्याचे प्रसिद्धी-माध्यमांद्वारे उघड झालेले आहे. दरम्यान, ठेकेदारीपद्धतीने करण्यात येणाऱ्या या नोकरभरतीमुळे, सरकारी तिजोरीवर पडणारा आर्थिक भार कमी करण्यासाठी, शासकीय-निमशासकीय कार्यालयांमधील कामांसाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय कामगार विभागाने दि. १४ मार्च-२०२३ रोजी घेतला होता.** त्यासाठी, मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या ऍक्सेंट टेक सर्व्हिसेस लि., सीएसएस आर्या सर्व्हिसेस, सीएससी ई-गव्हर्नन्स सर्व्हिसेस इंडिया लि., इनोवेव आयटी इन्फ्रास्ट्रक्चर लि., क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस प्रा. लि., सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. ली., उर्मिला इंटरनॅशनल सर्व्हिसेस प्रा. लि. या नऊ संस्थांची पाच वर्षांसाठी नेमणूक करण्यात आली. या संस्थांच्या माध्यमातून, प्रकल्प अधिकारी, प्रकल्प सल्लागार, वरिष्ठ अभियंता, कनिष्ठ अभियंता, लेखापरीक्षक, जिल्हा समन्वयक, विधी अधिकारी, शिक्षक, अधीक्षक, माहिती अधिकारी इ. अशा एकूण ७४ संवर्गातील, अतिकुशल पदांसाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच, निमशासकीय कार्यालयांसोबतच, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे, सार्वजनिक उपक्रमे यांनाही याच नऊ संस्थांकडून आवश्यक मनुष्यबळ घेणे बंधनकारक करण्यात आले. मात्र, कामगार विभागाच्या या निर्णयामुळे बेरोजगार तरुणांची पिळवणूक होणार असल्याचेच अधोरेखित होत आहे. मुळात या उपक्रमामुळे शासनाचे पैसे वाचणार नसून, ठेकेदारांचेच भले होणार आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, ठेकेदारीपद्धतीने जे मनुष्यबळ नियुक्त करण्यात येणार आहे, ते पूर्णपणे खासगी स्वरुपात भरण्यात येणार आहे आणि खासगीकरण अर्थात, कंत्राटी कामगार-पद्धत ही, नव अस्पृश्यता नावाची गुलामगिरी असल्याने, 'धर्मराज्य पक्षा'ने या शासननिर्णयाला कडाडून विरोध केला आहे. **'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे कामगारमंत्री सुरेश खाडे, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल आणि राज्याचे कामगार आयुक्त यांना पाठविलेल्या पत्रात, शासननिर्णयाला आपला कडाडून विरोध असल्याचे स्पष्ट करीत, शासकीय आणि निमशासकीय नोकऱ्यांच्या या कंत्राटीकरणामुळे, ठेकेदारांसोबतच राजकीय पुढाऱ्यांचेदेखील भले होणार असून, या कंत्राटी-कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युइटी मिळणार नसल्याने, त्यांचे निवृत्तीनंतरचे आयुष्य हलाखीत जाणार असल्याने, बाह्ययंत्रणा अर्थात खासगी ठेकेदारीमार्फत, शासकीय आणि निमशासकीय नोकरभरतीचा शासननिर्णय, त्वरित रद्दबातल करण्यात यावा आणि राज्य शासनाने याची गांभीर्याने नोंद घ्यावी, अशी मागणी करीत, तीव्र जनआंदोलनाचा इशारा महेशसिंग ठाकूर यांनी आपल्या पत्रातून दिला आहे.**

दरम्यान, कंत्राटी कामगार-पद्धत ही एकप्रकारची पिळवणूक असून, आधीच खासगी आस्थापना आणि बहुतांश सर्वच कारखान्यांमध्ये या माध्यमातून कष्टकरीवर्गाची आर्थिक पिळवणूक करण्यात येत असते. शिवाय आर्थिक सुरक्षितता व कामगार कायद्याप्रमाणे देण्यात येणाऱ्या इतर सोयी-सुविधांपासून कामगार-कर्मचाऱ्यांना धनदांडग्या भांडवलदारी व्यवस्थेकडून वंचित ठेवण्यात येते. **महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष राजन राजे हे, गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ, याच कंत्राटी-कामगारपद्धतीविरोधात, प्रस्थापित व्यवस्थेविरोधात संघर्ष करीत आहेत. केंद्र सरकार पुरस्कृत येऊ घातलेले काळे कामगार-कायदे याच व्यवस्थेचा भाग असून, यामुळे स्थानिक भूमिपुत्र तरुणवर्ग उध्वस्त होणार आहे. शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये कंत्राटीपद्धतीने जे मनुष्यबळ नियुक्त करण्यात येणार आहे, ती पाच वर्षांच्या तात्पुरत्या स्वरुपातील तरतूद असल्याने, नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा भविष्यकाळ अंधकारमय होणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे, भविष्यात बेरोजगार तरुणांची संख्या प्रचंड वाढून, सामाजिक असंतोष मोठ्याप्रमाणात वाढीस लागेल. मुळात राज्य शासनाच्या कामगार विभागाने, महाराष्ट्रातील कामगार-कर्मचारीवर्गासाठी, सुरक्षित रोजगार उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त असताना, उलट राज्याचे कामगार विभाग आणि राज्य सरकारच स्थानिक तरुणांना देशोधडीला लावण्याचे पापकर्म करीत असल्याचे महेशसिंग ठाकूर यांनी, उद्वेगाने नमूद केले आहे.** महत्त्वाची बाब म्हणजे, ठेकेदारीपद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या मनुष्यबळाला, राज्य शासनातील काही विभागांच्या सचिवांनीदेखील आक्षेप घेतलेला आहे. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, सुधारणा करण्याच्या नावाखाली, उपरोक्त निर्णय रद्द करुन, मंत्रिमंडळासमोर नव्याने प्रस्ताव आणण्याची मागणी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. त्यानंतर, मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाल्यावर, नव्याने सुधारित प्रस्ताव आणायचे आदेश कामगार विभागास देण्यात आले होते. याचाच अर्थ, ''तू मारल्यासारखं कर, मी रडल्यासारखं करतो'' हाच प्रकार घडला असून, नव-अस्पृश्यता नावाची गुलामगिरी महाराष्ट्रात आणून, तरुण कामगार-कर्मचाऱ्यांची पिळवणूक करुन, त्यांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान रचलेले आहे. **महाराष्ट्रातील स्थानिक भूमिपुत्रांच्या उज्वल भविष्याचा विचार करता, जर अशाप्रकारची कंत्राटी कामगार-पद्धत, महाराष्ट्र शासन दंडेलशाहीने लागू करणार असेल तर, महाराष्ट्रातील सामाजिक व्यवस्था उध्वस्त होण्यास वेळ लागणार नाही आणि म्हणूनच, या शासननिर्णयास प्राणपणाने विरोध करण्यासाठी आमचा 'धर्मराज्य पक्ष' लोकशाही व सनदशीरमार्गाने रस्त्यावर उतरल्याशिवाय आणि तीव्र जनआंदोलन उभारल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा गंभीर इशारा 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्रातून शेवटी दिला आहे.**

---

माणूस जोवर शेतात राबत असतो, तोवर तो इतर सजीवांसारखाच निसर्गाशी तादात्म्य राखलेला एक 'प्राणी' असतो... पण, शहरं उभारली व मग, शहरात आला की, तो महत्त्वाकांक्षाग्रस्त 'राक्षस' बनतो!

...शेतात, तो मनुष्यप्राणी या अर्थाने असतो की, प्राणी-पक्षी-कीटक-जलचरांप्रमाणेच तो स्वतःचं अन्न स्वतः मिळवतो, शोधतो. तो शहरात आला की मात्र, 'भांडवली-व्यवस्थे'तील कंपन्या-कॉर्पोरेट्समध्ये नोकरी करतो आणि नोकरी करुनच इतरांच्या जीवावर जगू पहातो, जो पूर्णतया निसर्गाविरुद्धचा व्यवहार असतो!

आपली जननी असलेली ही पृथ्वीमाता... ना उद्योग करण्यासाठी, ना नोकरी देण्यासाठी, ना तुमच्या कुठल्या महत्त्वाकांक्षा जोपासण्यासाठी आहे... ती आहे फक्त, बहुढंगी, बहुरंगी जीवन तिच्या अंगाखांद्यावर फुलवण्यासाठीच केवळ! त्या नैसर्गिक जगण्यातला सहजगत्या मिळणारा आस्वाद-आनंद घ्यायचा सोडून... कुठल्या न् कुठल्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन अवघं जगणंच, आपलं आपणच एक रणांगण बनवायचं आणि रोग-व्याधिग्रस्त होत, पिढी-दरपिढी विनाशाची वाटचाल करायची...???

***...राजन राजे***

*(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष... भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'... The First 'Green-Political Party' Of India)*

# रामाच्या नावावर फक्त, 'मतां'चा जोगवा'

**अस्मानाला भिडलेली महागाई, बेरोजगारी-अर्धरोजगारी, बेलगाम' खाजगीकरण, ढासळती अर्थव्यवस्था व भांडवली-व्यवस्थेचा दमनकारी उत्पात लपवण्यासाठी दंगलप्रवण धार्मिक-उन्मादाचं 'रावणराज्य' उभं करणाऱ्या'' 'लुच्च्या' रामभक्तां'चा रामाच्या नावावर फक्त, 'मतां'चा जोगवा'.**

**भारतीय स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट-२०२३च्या केंब्रिज विद्यापीठाच्या 'राम-कथा' कार्यक्रमाला ब्रिटनचे पंतप्रधान म्हणून नव्हे; तर, एक 'हिंदू' म्हणून सहभागी झालेले ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या, त्या कार्यक्रमाबाबतचे फोटो, व्हिडिओ... 'मोदी-अंधभक्तां'नी आणि भाजपाई 'आयटी-सेल'ने खरंतरं, फार मोठ्याप्रमाणावर 'व्हायरल' करणं अपेक्षित होतं.**

पण, तसं घडताना दिसलेलं नाही... कारण, माहित्येय कुणाला??? कारण, तसं जबरदस्तच आहे, 'बात कुछ राज की है'... अंधभक्तांच्या नीबर, जातधर्म-विद्वेषी मनाला व अंतःकरणाला फार फार काही त्यात झोंबणारं आहे, म्हणूनच तर, मित्रांनो, तसं घडलेलं नाही!

**...याचं कारण, ऋषी सुनक यांनी आपल्या भाषणाची सुरुवातच मुळी, 'जय श्रीराम'सारख्या भुवया ताणलेल्या क्रुद्ध, संतप्त वृत्तीच्या 'राम-संबोधना'ने अजिबात न करता... 'जय सियाराम' या वात्सल्यपूर्ण, प्रेमळ, कुटुंबवत्सल आणि संवेदनशील अशा पिढीजात, पारंपरिक राम-संबोधनाने केली... 'संघ-भाजपा'वाल्यांनी जाणिवपूर्वक मुस्लिमांवर मानसिक दबाव, दहशत निर्माण करण्यासाठी रागीट, उग्र स्वरुपाच्या बनवलेल्या या 'जय श्रीराम' संबोधाचा वापर, ब्रिटीश पंतप्रधान ऋषी सुनक यांनी कटाक्षाने टाळला... आणि, ती बाब आता भाजपा-संघवाल्यांसाठी ''सहन होत नाही आणि सांगता येत नाही'', असं अवघड जागीचं दुखणं बनलंय!**

'जय श्रीराम', हे मूळच्या 'जय सियाराम', या रामाच्या प्रेममय, कारुण्यमय, आज्ञाधारक व तत्त्वनिष्ठ प्रतिमेला सरळ सरळ छेद देणारं, हाती 'धनुष्यबाण' घेऊन 'रामबाण' सोडणारं युद्धप्रवण-संबोधनच! लालकृष्ण अडवानींच्या उत्तर भारतातील रथयात्रेच्या आसपास मुद्दामहून, संघ-भाजपातर्फे 'मंडलमय' भारत, 'कमंडलमय' करण्यासाठी... 'जय श्रीराम', हे यादवी-युद्धज्वर पसरवू पहाणारं संबोधन व 'धनुष्यधारी राम' हे चित्र प्रसवलं गेलं होतं. लालकृष्ण अडवाणींच्या 'मंदिर वहीं बनायेंगे' रथयात्रेपूर्वी, या दोन्ही गोष्टी भारतात कुठेही फारशा प्रचलित नव्हत्याच कधि!

**आमची 'सीतामाई' किंवा 'सीतामैय्या' आली की, कारुण्य, प्रेम, वात्सल्य आपोआप तिच्या मागोमाग नाजूकसाजूक पावलं टाकीत आलंच समजा; पण, सीतेला जर जाणिवपूर्वक तुम्ही टाळलीत आणि खांद्यावर धनुष्यबाण घेतलेला, सीतेविना एकटा वनवासी 'राम' दाखवलात की, तो प्रातःस्मरणी वंदनीय असलेला ममत्वाने भरलेला कुटुंबवत्सल, एकवचनी आदर्शवत राम, 'मुळचा खराखुरा जाज्वल्य राम' शिल्लक न रहाता, संघ-भाजपाई ब्रॅण्डचा मुरलेला प्रचारक-संहारक बनलाच म्हणून समजा! आपल्या ढोंगी, बेगडी, बनावट 'हिंदुत्वा'आडचे... पाशवी राजकीय हेतू साध्य करण्यासाठी, एकप्रकारे 'कृपाळू देवाला, हिंसक दानवसदृश्य पेशकश' करण्याची, ही घृणास्पद संघीय चाल व तिरस्करणीय भाजपाई धडपडच होय!**

माझे आजोबा अष्टौप्रहर रामाच्या व कृष्णाच्या भक्तित रंगलेले, तल्लीन झालेले एक सच्चे 'रामकृष्ण-भक्त' होते... आजोबा सांगायचे, ''राम हा विष्णुचा 'पूर्णावतार' तर कृष्ण, हा विष्णुचा 'परिपूर्ण अथवा संपूर्ण' अवतार... रामाच्या व्यक्तित्वात काही दोष आपल्याला उघड दिसतात; पण, कृष्णाच्या व्यक्तित्वात, व्यवहारात तसा दोषपूर्ण लवलेशही कुठे आढळत नाही... म्हणून, 'अपूर्ण' अथवा दोषपूर्ण रामाला सहसा एकटा दाखवला जात नाही, ती 'अपूर्णता' भरुन काढण्यासाठी कायम तो लक्ष्मण, सीता व हनुमानासमवेतच दाखवला जातो. पण, विष्णुचा 'परिपूर्ण' अवतार असलेला कृष्ण मात्र, त्याच्या 'स्वयंभू पूर्णत्वा'ने एकटा दाखवण्याची पूर्ण मुभा आहे, तसा तो अनेकदा हाती 'सुदर्शन चक्र' घेऊन 'परित्राणाय साधुनाम्, विनाशायच दुष्कृताम्' अशा 'दुष्ट-दुर्जनांच्या संहारासाठी युद्धसज्ज असलेल्या प्रलयंकारी आविर्भावात दाखवलाही जातो... आणि, म्हणूनच गोकुळातला मुरलीवर मधुर संगीत वाजवून राधेला भुरळ घालणारा 'कृष्ण', हा तसा संगीतप्रेमी न रहाता, महाभारतातला 'युद्धसंगीत' छेडणारा 'श्रीकृष्ण' बनतो...!!!''

**...असो, अयोध्येला 'राममंदिर' वगैरे बांधून रामाच्या नावावर फक्त, 'मतां'चा जोगवा' मागणारे; पण, प्रत्यक्षात जनकल्याणकारी 'रामराज्या'ऐवजी... अस्मानाला भिडलेली महागाई, बेरोजगारी-अर्धरोजगारी, बेलगाम खाजगीकरण, ढासळती अर्थव्यवस्था व भांडवली-व्यवस्थेचा दमनकारी उत्पात लपवण्यासाठी दंगलप्रवण धार्मिक-उन्मादाचं 'रावणराज्य' उभं करणाऱ्या'' 'लुच्च्या' रामभक्तां'ची, हिंदीतल्या 'जय सियाराम' किंवा मराठीतल्या 'जय सीताराम' ऐवजी, 'जय श्रीराम' ही घोषणा, म्हणजे एक फसवी राजकीय चाल आहे, बस्स... त्यात, जातिवंत 'भावभक्ति' आपल्याला कुठे अभावानेच आढळेल... धन्यवाद!**

*.... राजन राजे (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)*

---

**मराठा तरुणाईनं, अन्याय-अत्याचार-शोषणाविरुद्ध ठामपणे उभं राहिलं पाहिजे !!! - राजन राजे** *..(पान क्र. १ वरुन)*

नोकरदारांच्या गळ्यात 'कंत्राटी-गुलामी'चे पट्टे बांधणारे 'कंत्राटदार', हे वस्तुतः, मधल्यामध्ये कंत्राटी-कामगारांच्या घामाच्या पैशाचा वाटा लुटणारे 'चोर-दरोडेखोर'चं असतात आणि ते बहुशः, 'प्रस्थापित राजकारणीवर्गा'तून किंवा त्यांच्या छुप्या भागीदारीतून आलेले असतात. असे राजकीय-ताकद असणारे कंत्राटदार, मालक-व्यवस्थापकीयवर्ग व शासन-प्रशासन यांची आपापसात गुन्हेगारी-संगनमताने बनलेली रक्तपिपासू- निर्मम-शोषक 'व्यवस्था' (Vampire-StateSystem)... हे 'कंत्राटी-पट्टे' हातात धरुन, जणू 'श्वान-मालकां'नी त्यांच्या भूभूंना (कुत्रे, हा फार कठोर शब्द इथे टाळलाय) हवं तिथे फिरवत रहावं, तसं या तरुणाईला बिनदिक्कत सगळ्या उद्योग-सेवाक्षेत्रात फिरवताना दिसते!

**...ही 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता'स्वरुप असणारी कंत्राटी-कामगार पद्धत, Out Sourcing, NEEM यांच्या समूळ निर्मूलनासंदर्भात काही आश्वासक भाष्याची, आत्ताच राहुल गांधींकडून निवडणूक-पूर्व अपेक्षा बाळगणं, कदाचित चुकीचं ठरेल... एकाचवेळेस, अनेक मोठमोठ्या अपेक्षांची ओझी, राहुल गांधींच्या खांद्यावर लोकसभा-निवडणुकीपूर्वीच लादणं; तसं, अयोग्य व त्यांच्यावर अन्याय करणारं असलं तरीही... मोदी-शाह भाजप-सरकारने भांडवलदारांच्या श्रीमंतीत व सत्तेत बेगुमान भर घालण्यासाठी व कामगार-कर्मचारीवर्गाला गुलामगिरीच्या अंधःकारात कायमचं ढकलून देण्यासाठी आणलेली... 'चार काळ्या कामगार-कायद्यां'ची काळीकुट्ट 'कामगार-संहिता' (Labour-Code) INDIA आघाडीनं सत्तेवर येताच तत्काळ मागे घेण्याचं ठाम आश्वासन, त्यांच्या निवडणूकपूर्व 'जाहीरनाम्या'त दिलंच पाहीजे, हा आपल्या सर्वांचा आग्रह रहायलाच हवा!**

...लोकसभा-२०२४ निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने, बहुमताने INDIA आघाडीला सत्तेवर आणल्यानंतर मात्र, कंत्राटी-कामगार पद्धत, OutSourcing, NEEM या लाखो-करोडो श्रमिक आत्म्यांना भेडसावणाऱ्या, त्यांना पायदळी तुडवणाऱ्या... या मूळ प्रश्नांना हात घातला गेलाच पाहिजे. तोपर्यंत त्याचं, केवळ सूतोवाच करुन न थांबता, त्याविरोधात खणखणीत आवाज व तो ही, आजच उठवला पाहिजे... आणि, त्यादृष्टीनेच, आगामी लोकसभा-विधानसभा (महाराष्ट्राच्या) निवडणुकांकडे 'धर्मराज्य पक्ष' बारकाईनं पहातोय!

**सध्याचं, मोदी-शहाप्रणित भाजपाई केंद्र सरकार आणि मा. उध्दवजींच्या शब्दात 'एक फूल दोन हाफ' असं महाराष्ट्रातलं शिंदे-फडणवीस-पवार सरकार ('फ'डणवीस-'शिं'दे... या दोहोंच्या आडनावांच्या आद्याक्षरांकडे पाहीलं तर, हे सरकार जनतेला 'फशी' पाडणारं सरकार होतंच... त्यात आता, पाठीत 'वार' करणाऱ्या 'पवारां'ची भर पडलीय; म्हणजे, महाराष्ट्रातल्या 'कंत्राटी-कामगारां'सारख्या तळागाळातल्या बहुसंख्य उपेक्षित-शोषित जनतेच्या दुर्दशेला कुठून पारावार उरणार?)... भाजपाई केंद्र-सरकार हेच, देशावरचं व महाराष्ट्रावरचं मोठं संकट असल्याने, २०२४ पर्यंत त्यांचा संपूर्ण पाडाव करण्यावरच लक्ष केंद्रित करण्यावाचून दुसरा पर्याय सध्या नाही... धन्यवाद!**

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...***

Zero-Tolerance Towards CORRUPTION nd EXPLOITTION OF Man Nature)

# कळवा रुग्णालयातील मृत्यूचे तांडव, महापालिका प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच!

## ‘धर्मराज्य पक्षा’चा ठाणे महानगरपालिकेवर थेट आरोप...

**ठाणे (प्रतिनिधी) :** ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात, शुक्रवार, दि. ११ ऑगस्ट-२०२३ रोजी, पाच रुग्णांचा योग्यवेळी उपचार न मिळाल्याने, दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक आणि संतापजनक घटना घडलेली असतानाच, दोन दिवस उलटत नाहीत तोच, एकाच रात्रीत पुन्हा एकदा, तब्बल १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दरम्यान, यासंदर्भात काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील आरोग्यसेवेच्या उडालेल्या बोजवाऱ्याबाबत, प्रसिद्धीमाध्यमांत वृत्त प्रकाशित झाले होते. त्या पार्श्वभूमीवर ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांना, दि. ०७ ऑगस्ट २०२३ रोजी पत्र लिहून, (संदर्भ क्र.: धराप/मनपाआ/ठामपा/ठाणे/२०२३/६१) रुग्णालयातील आरोग्यसेवा तात्काळ सुस्थितीत आणून, शस्त्रक्रियेसाठी रुग्णांना सहा महिन्यांची प्रतीक्षा करायला न लावता, शस्त्रक्रियेचा कालावधी २४ तासांवर आणण्याची आग्रही मागणी केली होती. या घटनेला तीन दिवस उलटत नाहीत तोच, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील हे मृत्यूचे तांडव घडले असून, त्याला सर्वस्वी ठाणे महानगरपालिकेचे प्रशासनच जबाबदार असल्याचा थेट आरोप, ‘धर्मराज्य पक्षा’ने आपल्या प्रसिद्धीपत्रकातून केला आहे. रुग्णालयातील १४ पैकी ४ अत्याधुनिक शस्त्रक्रिया विभाग पूर्णपणे बंद असून, त्याचा विपरीत परिणाम रुग्णालयात उपचारार्थ दाखल झालेल्या अत्यवस्थ रुग्णांवर होत असून, अशाप्रकारच्या हलगर्जीपणामुळेच २३ बळी गेले आहेत. दोन दिवसांपूर्वी पाचजणांचे मृत्यू झाल्यानंतरही, प्रशासनाने ही बाब गंभीरपणे घेतलेली नसल्यानेच, पुन्हा १८ बळी गेले असून, त्यास सर्वस्वी संबंधित अधिष्ठाता व रुग्णालय प्रशासनच जबाबदार असल्याचा आरोप, ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, आपल्या प्रसिद्धीपत्रकातून केला आहे.

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या विठ्ठल सायन्ना जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या (सिव्हिल हॉस्पिटल) नवीन इमारतीचे बांधकाम सुरु असल्याकारणाने, त्याचा संपूर्ण भार हा, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयावर पडत आहे. शिवाय ठाणे शहरासह, ठाणे जिल्हा आणि पालघर जिल्ह्यातूनही दररोज १००० ते १२०० रुग्ण उपचारासाठी येत असतात, त्यातील ५० ते ६० रुग्ण दररोज उपचारार्थ दाखल होतात. रुग्णालयाचा अनागोंदी कारभार, डॉक्टरांची अपुरी संख्या, रुग्णांच्या संख्येत झालेली वाढ, सोयी-सुविधांचा अभाव आणि बेशिस्त रुग्णालय प्रशासन, याच कारणांमुळे हे मृत्यूचे तांडव घडलेले आहे. परंतु, रुग्णालय प्रशासनाकडे कोणत्याही प्रकारचे नियोजन नसल्यामुळेच, आरोग्यसेवेचा पुरता बोजवारा उडून, त्यातून एकूण २३ रुग्णांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडलेली आहे. ठाणे शहरात झालेल्या किंवा सध्या करण्यात येत असलेल्या सुशोभीकरण आणि रंगरंगोटीवर, लाखो रुपयांचा अनावश्यक खर्च करण्यापेक्षा, तो पैसा शहराच्या मूलभूत सोयी-सुविधा यांच्यासाठी वापरण्यात यावा, अशी मागणी ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना, दि. २३ मे-२०२३ रोजी पत्र (धराप/मुमं/मरा/ममुं/२०२३/३३) पाठवून केली होती. मात्र, त्यावरदेखील शासनाने गांभीर्याने विचार केला नाही, असेही नितीन देशपांडे यांनी, आपल्या प्रसिद्धीपत्रकात स्पष्ट केले आहे. या घटनेमुळे मुख्यमंत्र्यांच्या ठाणे शहराच्या प्रशासकीय व्यवस्थेचे वाभाडे अवघ्या महाराष्ट्रात निघालेले आहेत. तरी, या घटनेला जबाबदार असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील संबंधित मुख्य वैद्यकीय अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करुन, त्यात दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, आपल्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.




## ‘धर्मराज्य पक्षा’चे ठामपा आयुक्तांना खरमरीत पत्र...

**ठाणे (प्रतिनिधी):** ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील आरोग्यसेवेचा बोजवारा उडालेला असल्याबाबतचे वृत्त, वर्तमानपत्रांत प्रकाशित झाल्यानंतर, रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेल्या रुग्णांना सहा-सहा महिने प्रतीक्षा करावी लागत असल्याचे, बातमीच्या माध्यमातून उघड झाले आहे. ही बाब अत्यंत धक्कादायक आणि क्लेशदायक तसेच, मुख्यमंत्र्यांच्या ठाणे शहरासाठी अत्यंत लाजिरवाणी अशी असल्याची टीका ‘धर्मराज पक्षा’च्या वतीने करण्यात आली असून, त्याबाबतचे पत्र ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांना पाठविण्यात आले आहे. वर्ष-१९९२ पासून; म्हणजे, रुग्णालयाच्या निर्मितीपासूनच छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हे, वादाच्या भोवऱ्यात सापडलेले आहे. या ठिकाणी देण्यात येणारी आरोग्यसेवा ही चिंतेची बाब असतानाच, रुग्णालयात उपलब्ध असणाऱ्या विविध सेवा, रुग्णांना देण्यात येणारी औषधं, रुग्णालयाचा अवाढव्य विस्तार आणि त्यासाठी पाणी-वीज व मनुष्यबळावर येणारा खर्च पाहता, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हे, ठाणे महानगरपालिका प्रशासनासाठी पांढरा हत्ती पोसण्यासारखेच आहे, असे पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. दरम्यान, शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना, तब्बल सहा-सहा महिने प्रतीक्षा करावी लागत असल्याचे भीषण वास्तव, प्रसिद्धीमाध्यमांद्वारे उघड झाले असून, शस्त्रक्रियेसाठी सहा महिने प्रतीक्षा करुन, आपल्या जीविताशी खेळण्यापेक्षा, नाईलाजास्तव येथील रुग्णांना, खासगी रुग्णालयांत धाव घ्यावी लागत आहे. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना, कमीतकमी वेळेत उत्तम दर्जाची वैद्यकीय सेवा मिळावी, यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निर्देश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी काही महिन्यांपूर्वी दिले होते. निवासी डॉक्टरांची संख्या वाढविणे, संगणकीकृत व्यवस्था मार्गी लावणे, याबाबतच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या. रुग्णालयाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेऊनदेखील, आरोग्यसेवेत सुधारणा होण्याऐवजी, ती अधिकाधिक बिघडत जाऊन, पुरता बोजवारा उडाला असल्याने, याप्रकरणी आयुक्तांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याची मागणी, ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, आपल्या पत्रातून केली आहे.

दरम्यान, ठाणे शहराच्या मध्यभागी असलेल्या विठ्ठल सायन्ना जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या (सिव्हिल हॉस्पिटल) नवीन इमारतींचे बांधकाम सुरु करण्यात आल्याने, तेथील रुग्णांचा संपूर्ण भार हा, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयावर पडत आहे. अशा परिस्थितीत, रुग्णालय प्रशासनाने, अतिरिक्त सोयी-सुविधांनी सुसज्ज असणे क्रमप्राप्त असताना, उलट छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील १४ पैकी ४ अत्याधुनिक शस्त्रक्रिया विभाग बंद अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. ठाणे शहरासह, ठाणे जिल्हा आणि पालघर जिल्ह्यातून दररोज १००० ते १२०० रुग्ण, उपचार घेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात येत असतात. त्यातील ३० ते ५० रुग्ण, दररोज उपचारार्थ रुग्णालयात दाखल (रवाळी) होत असतात. मात्र, त्यांच्यावर योग्य ते उपचार होत नसल्याने, रुग्णालयातील आरोग्यसेवेचा पुरता बोजवारा उडाला असल्याचे अधोरेखित झालेले आहे. याच पार्श्वभूमीवर, ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, यासंदर्भात छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या प्रशासकीय विभागाशी दि. १ ऑगस्ट-२०२३ रोजी, दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता, तिथे उपस्थित असलेल्या श्री. माळगांवकर यांनी, सविस्तर माहिती देण्यास असमर्थता दर्शवून, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेश हेच याबाबत अधिक खुलासा करतील असे सांगून, तुमच्याशी संपर्क साधला जाईल, असे सांगितले; मात्र, त्यानंतर अद्यापपर्यंत कोणीही संपर्क साधलेला नाही, याचीदेखील आठवण आयुक्तना पाठविलेल्या पत्रात करण्यात आली आहे. दरम्यान, ही बाब अत्यंत गंभीर असून, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील आरोग्यसेवा सुस्थितीत आणण्यासोबतच, शस्त्रक्रियेसाठी कराव्या लागणाऱ्या सहा महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी, तात्काळ २४ तासांवर आणावा आणि रुग्णालयात अधिक सुसज्ज आणि अद्ययावत यंत्रणा सुरु करावी, अशी आग्रही मागणी ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात शेवटी केली आहे.

# कंत्राटी-पद्धतीची 'अवदसा'

'तळागाळातील वर्गाला बरबाद करणारी... कंत्राटी-पद्धती'ची 'अवदसा'; फक्त, कॉर्पोरेटीय-क्षेत्रातच वापरली जाते, असं नव्हे; तर, आता जातधर्मीय-दंगलींचीही 'कंत्राटं' दिली-घेतली जातात... मणिपूरपासून, महाराष्ट्र (कोल्हापूर), हरियाणापर्यंत (नूँह, फरीदाबाद, गुरुग्राम, मेवात) संपूर्ण देशभर!

...त्याची उपकंत्राटं (Sub-Contracts) देखील दिली जातात ती, आदिवासी-ओबीसी जमातींच्या हातात शस्त्रं देऊन, म्हणजेच, त्यांचं 'क्षत्रियीकरण' करुन. पण, या 'मंडल'वाल्या (मंडल-आयोग) वर्गाचं गरजेनुसार एकवेळ 'क्षत्रियीकरण' करत त्यांना 'मांडलिक' बनवलं जातं... पण, त्यांचं 'कमंडलीकरण' करुन वर्णवर्चस्ववादी-शोषकवर्गाच्या बरोबरीच्या पंक्तिला मात्र, त्यांना कधिच बसवलं जातं नाही!

**'एकलव्या'ला 'शूद्र' म्हणून धनुर्विद्या शिकवण्यास द्रोणाचार्य महाभारतात सपशेल नकार देतात... मात्र, धनुर्विद्येत स्वतःहून पारंगत झालेल्या एकलव्याला गरजेपोटी, कुरुक्षेत्रावरील युद्धात कौरव सैन्यात आग्रहपूर्वक सामावून घेतलं जातं; पण, 'उच्चवर्णीय आणि एकलव्य' यातला 'पंक्तिभेद', महाभारतात एकलव्याच्या मृत्यूपर्यंत कायमच अस्तित्वात रहातो... अगदी तस्सचं!**

**...वर्णवर्चस्ववादी-शोषकवर्गाची 'गुलामी' स्विकारण्याची एकलव्याची, जी क्षुद्र मानसिकता ('गुरुदक्षिणा' म्हणून द्रोणाचार्यांनी क्रूरपणे व अन्यायकारकरित्या एकलव्याच्या उजव्या हाताचा अंगठा कापून घेतलेला असतानाही) महाभारताच्या पानापानावर दिसून येते... त्याचीच, 'री' ओढताना मराठा, ओबीसी आदिवासी व मागासवर्गीय समाज, आज आधुनिक भारतातही दिसून येतो, या दळभद्री-क्षुद्र वृत्तीला आणि दुर्दैवाला काय म्हणावं?**

'क्षत्रियीकरण' झालेल्या, या 'मंडल'वाल्या नव-



शस्त्रधारी मंडळींना, 'कमंडल'धारी मंडळींच्या पायाशी पूर्ण निष्ठा वाहून, 'नागपुरी कमंडल-विचारधारे'ची 'गुलामी', ही पत्करावीच लागते! त्याशिवाय, त्यांना इतर कुठलाही पर्याय उपलब्ध नसतोच. भ्रष्टाचारातून कमावलेली अपसंपदा टिकवून धरण्यासाठी व केल्या पापकर्मांमुळे होणाऱ्या संभाव्य तुरुंगवासातून सुटका करवून घेण्यासाठी; तसेच, 'भांडवली-व्यवस्थे'च्या आशिर्वादाने सहजी उपलब्ध होऊ शकणाऱ्या सत्ता-संपत्तीच्या अनावर मोहापायी... आपल्याच हाडामांसाच्या, आपल्याच रक्ताच्या बहुजन समाजाचा 'घात' करायला, हा 'मंडल'वाला नव-शस्त्रधारीवर्ग एका पायावर तयार होताना दिसतो, या अधम स्वार्थाला व नीचतेला काय म्हणावं?

**बहुजन समाजातील मूठभर राजकीयदृष्ट्या 'स्मार्ट', 'बाहुबली' (म्हणजेच संधिसाधू, बदमाष, गुंडपुंड) मंडळींना हाताशी धरुन, पडद्यामागून 'रक्तपिपासू-शोषक व्यवस्था' (भांडवलदार + राजकारणी + सरकारी अधिकारी) चालवणारी हीच मूठभर संख्येची मंडळी, देशाच्या कारभाराची सगळी सूत्रं हलवत असतात. पहिल्या फळीच्या नेत्यांच्या खालोखाल, विविध राजकीय-पदांच्या वाटलेल्या खिरापतीने सुखावलेले** (False-Trappings Of Power) **अनेक बहुजन कार्यकर्ते, पदाधिकारीही असतात. ही राजकारणातली दुसरीतिसरी 'फळी' म्हणजे, व्यवस्थेचे पक्के ठरलेले 'बळी'! अगदी, कंपन्या-कॉर्पोरेट क्षेत्रात जसं घडत असतं; अगदी तसंच, वरपासून खालपर्यंत, अशी 'जी हुजूर' म्हणत, जराही विचार न करता वरच्यांचे सगळे आदेश निमुटपणे पाळण्यात धन्यता मानणारी, कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांची कोडगी-नीतिमत्ताशून्य बहुजनजमात, याच भांडवली-व्यवस्थेची भक्कम 'आधारशिला' बनलेली असते.**

तिचं परिस्थिति, थोडा तपशीलातला बदल वगळता, मुस्लिमांमध्येही मौजूद आहेच... फरक इतकाच की, 'नागपूर'ची जागा 'हैद्राबाद' घेतं... मंदिरं-देवळात पौरोहित्य करणाऱ्या जमातीची जागा, मदरसे-मस्जिदीतले मुल्ला-मौलवी-इमाम घेतात, बस्स्!

'मंडल-आयोग व सच्चर-आयोग', या दोन आयोगांकडून, या दोन्ही हिंदू-मुस्लिम जातधर्मीय बहुजनवर्गांची हलाखीची, लाचारीची परिस्थिती अतिशय केविलवाण्यारितीने उघडी पडूनही, त्यांचे डोळे उघडायला तयार नाहीत?

''मुकी बिचारी कुणीही हाका, अशी मेंढरं बनू नका,
जाते घडी अपुली साधा, काय करा ते आता करा''...

**असं कितीही कोणी तळमळून सांगितलं; तरीही, तळागाळातील गोरगरीब हिंदू-मुस्लिमांच्या दंगलप्रवण हिणकस मानसिकतेत अजून बदल घडायला तयार नाही... त्यामुळेच, देशातली सत्ताधुंद राजकीय मंडळी, निवडणुका जिंकण्यासाठी व आपल्या भांडवलदार-मित्रांच्या फुटेस्तोवर फुगलेल्या ढेऱ्या, अजून ठासून भरण्यासाठी... याच बहुजन हिंदू-मुस्लिमांची माथी भडकावून कधिही हुकमी दंगली पेटवू शकतात, ही वस्तुस्थिति आहे...**

नागपूर, हवं तेव्हा-हवं तिथे, देशात हुकमी 'मणिपूर-कोल्हापूर' घडवू शकतं...हैद्राबाद, देशात नूँह-मेवात-फरीदाबाद घडवू शकतं... हे अनुभवल्यावर, या भांडवली-व्यवस्थेच्या नीच-अमानुष 'नागपुरी-हैद्राबादी' डावपेचांना उठसूठ सहजी 'बळी' पडणारी, ही हिंदू-मुस्लिम बहुजन मंडळी नक्की माणसं आहेत की, निर्बुद्ध जनावरं, हा प्रश्न पडल्याखेरीज रहात नाही...!!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

## अरबी इतिहासकार इब्न-अल-अथिर (११६०-१२३४)...

चंगीजखानाच्या सैन्याने जेव्हा बुखारा (उझबेकिस्तान) शहराला वेढा घातला, तेव्हा एकदम चढाई करुन ते शहर ताब्यात न घेता... त्याने शहरातल्या नागरिकांना खलिता पाठवला, ''जे आमच्या बाजुला वळतील, ते पूर्णतः सुरक्षित रहातील''!

बुखारा शहरातल्या रहिवाशांमध्ये त्यामुळे दोन गट पडले. त्यातल्या पहिल्या गटाने चंगीजखानचा हुकूम धुडकावून लावला; तर, दुसऱ्या गटाने चंगीजखानचं म्हणणं मान्य केलं.

चंगीजखानने, आपल्या बाजुला वळलेल्या, त्या दुसऱ्या गटाला सांगितलं, ''तुम्ही जर माझी आज्ञा मोडणाऱ्यांविरुद्ध लढलात... तर हे शहर, मी तुमच्या ताब्यात देऊन निघून जाईन''.

चंगीजखानच्या आदेशानंतर, बुखारा शहरातल्या मूळ नागरिकांच्या त्या दोन गटात, तुंबळ युद्ध पेटलं. सरतेशेवटी, चंगीजखानचे पाठीराखे युद्ध जिंकले... पण, नंतर एक भयंकर धक्कादायक घटना घडली!

बुखारा शहराला वेढा घालून बसलेल्या चंगीजखानच्या आक्रमक सैन्यानं अचानक हाती शस्त्रं धारण केली आणि त्यांनी त्या विजेत्या गटातल्या लोकांची प्रचंड कापाकापी सुरु केली.

...तद्पश्चात, चंगीजखान उद्गारला, ''ते जर खरोखरच सज्जन व सुजाण नागरिक असते; तर, त्यांनी आपल्यासारख्या परक्या लोकांसाठी, त्यांच्याच हाडामांसाच्या बांधवांशी कधिच 'गद्दारी' केली नसती''!

मित्रहो, आधुनिक काळात 'भांडवली-व्यवस्था' चालवणाऱ्यांना, असे जागोजागी 'गद्दारी'चे उत्पात, एखाद्या 'सिरीयल-कीलर'प्रमाणे घडवून आणावेच लागतात... त्याशिवाय, अनन्वित अन्याय-शोषण-अत्याचार करुनही कुठलाही सामूहिक प्रतिकार अथवा बंड-विद्रोह न होता, मूठभर भांडवलदारवर्गाला बहुजनांवर लोकशाही-प्रक्रियेत सुखनैव राज्य करता येतं नाही... त्यामुळे, चंगीजखानाचीच आक्रमक-शोषक-अत्याचारी वृत्ती अंगी असणारे हे लोक, चंगीजखानापेक्षा थोडा वेगळा पवित्रा धारण करताना (अनेक अशा घटनाक्रमांच्या साखळी-प्रक्रियेत, ही काळजी घ्यावीच लागते) हल्ली बऱ्याचदा दिसतात. या बदलामध्ये, 'सत्ता आणि संपत्ती'च्या वर्षावात, या नीच-नराधम गद्दारांना नाही म्हटलं; तरी 'भांडवली-व्यवस्था' थोडाफार काळ, समृद्धीनं थोडं न्हाऊमाखू घालतात... पण, गरज संपताच किंवा त्यांची 'उपयोगिता' अथवा 'उपयोगमूल्य' संपताच, त्यांच्या ढुंगणावर लाथ मारुन त्यांना हाकलून देतातच आणि मग, ते 'गद्दार'... गीतेतील कृष्णाच्या अमोघ अशा 'कर्मसिद्धांतां'नुसार वरकरणी कितीही समृद्धीला पावलेले दिसले, तरीही 'केल्या नीचकर्मां'तून सततच्या लागलेल्या सदसद्विवेक बुद्धीच्या टोचणीने, ते आतून साफ ढासळलेले असतात... आणि, ते गद्दार व त्यांच्या पुढील पिढ्या अनंतयातना-नरकयातना भोगण्याला पात्र ठरतात!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९६६ साली मिझोरामवर, हवाईदलाला 'बॉम्बफेक' करायचा आदेश कुठल्या परिस्थितीत दिला होता...???

..(पान क्र. १ वरुन)

अगदी थोडक्यात त्याची पार्श्वभूमी ही की, आसामच्या खडतर पर्वतीय (पहाडी) प्रदेशांना एकत्र करुन एक 'स्वतंत्र राज्य' बनवण्याच्या मागणीपासून ते अगदी 'मौतम-फ्रंट'चे (मौतम-दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर १९६० साली तयार झालेली व दुष्काळग्रस्त मिझो-जनतेला शिधा पुरवण्यासाठी मरमर मेहनत केल्याने अत्यंत लोकप्रिय झालेली संघटना) प्रमुख 'लाल डेंगां'च्या नेतृत्त्वाखाली भारतातून फुटून निघण्याच्या देशविघातक रक्तरंजित संघर्षापर्यंत... अनेक घटना १९५५ नंतर झपाट्याने घडू लागल्या होत्या. याच दरम्यान, १९५९ साली मिझोराममध्ये पडलेल्या भयंकर दुष्काळाने ('मौतम-दुष्काळ', या नावाने संबोधित) हजारो माणसं दगावली आणि तेथील परिस्थिती पूर्णतया नियंत्रणाबाहेर जाऊ लागली. **साधारण दोन वर्षांनंतर १९६१-६२ मध्ये (चीनने भारतावर आक्रमण केल्याच्या सुमारास) दुष्काळी-परिस्थिती बर्यापैकी नियंत्रणात आल्यानंतर लाल डेंगा यांच्या, याच काळात जागृत झालेल्या राजकीय-महत्त्वाकांक्षेपोटी, याच 'मौतम-फ्रंट'चं रुपांतरण 'मिझो नॅशनल फ्रंट' (MNF) मध्ये झालं आणि त्यांचंही नेतृत्त्व भारतीय-सैन्यदलात पूर्वी 'हवालदार' असलेल्या लाल डेंगाकडेच चालून आलं... १९६६ पासून आपला 'सैनिकी-खाक्या' दाखवत लाल डेंगाने मिझोराम लगतच्या तत्कालीन पूर्व पाकिस्तान (इंदिरा गांधींनी 'बांगला देश' स्वतंत्र करण्यापूर्वीचा) व लाल चीनच्या चिथावणीने 'स्वतंत्र मिझोराम राष्ट्र' निर्मितीसाठी भारताविरुद्ध सरळ सरळ युद्धच पुकारलं.** टेलिफोन संपर्क-यंत्रणा, वहातूक-व्यवस्था उध्वस्त करण्यात आली, सरकारी-आस्थापनांवर सशस्त्र हल्ले चढवण्यात आले. एवढंच नव्हे, तर लाल डेंगाच्या राक्षसी-महत्त्वाकांक्षेला विरोध करणाऱ्या व मनाने भारतीय असलेल्या बहुसंख्य मिझोरामी जनतेचा नरसंहार सुरु झाला. हा सगळाच अविचारी व विवेकशून्य हिंसाचारी राजकीय व्यवहार लाल डेंगाने स्थापन केलेल्या 'डॅगर-ब्रिगेड'च्या अधिपत्याखाली चालू होता. लाल डेंगा, स्वतः पाकिस्तानच्या कराचीत सुरक्षित बसून हे सर्व करत होता आणि 'बिगर-मिझोरामी' जनतेला, ''मिझोराम सोडा अथवा आपले प्राण सोडण्यास तयार व्हा'' अशा धमक्या कराचीतून देत होता. जवळपास मिझोरामचा भारताशी पूर्ण संपर्क-संबंध तुटल्यासारखा झाला होता व तशात, मिझोराममध्ये फारचं अपुरं भारतीय सैन्य तैनात असल्याची तेव्हा अडचणीची स्थिती होती.

**अशा अत्यंत गंभीर व विस्फोटक परिस्थितीत तत्कालीन लष्करप्रमुख जनरल माणेकशा यांनी, नुकत्याच पंतप्रधानपदावर आरुढ झालेल्या इंदिरा गांधींना, मोलाचा सल्ला दिला की, मिझोरामच्या दुर्गम डोंगराळी भागामुळे लष्कर पाठवल्यास लष्कर इच्छित स्थळी पोहोचायला खूप वेळ लागेल व कारवाईत यश मिळवताना फार मोठी लष्करी-जिवितहानी होईल. त्यापेक्षा, हवाईदलाच्या विमानांनी व हेलिकॉप्टर्सनी जर आयझॉलमधील (आताचा मिझोराम) लाल डेंगाच्या अतिरेक्यांच्या अड्ड्यांवर व काही विशिष्ट ठिकाणी एकाचवेळेस अचूक 'बॉम्बफेक' करुन (सर्जिकल-स्ट्राईक्स) ते पूर्ण उध्वस्त केले तर, याअगोदरच जनतेपासून तुटून अलग पडलेल्या लाल डेंगाचं पेकाट साफ मोडून पडेल... झालंही अगदी तस्सच, बहुसंख्य मिझोरामी जनतेचा भारताला असलेला पाठींबा आणि या भारतीय हवाईदलाची अतुलनीय कामगिरीच्या बळावरच मिझोराम भारतात टिकला व भारतासाठी 'स्वतंत्र मिझोराम-राष्ट्रा'च्या रुपाने तयार होऊ पहाणारी, कायमस्वरुपी फार मोठी डोकेदुखी टळली.**

...जरी बॉम्बफेकीचा 'शिमगा' संपला होता; तरी, अशांत-मिझोरामचं 'कवित्व' शिल्लक उरलं होतंच'!

यासंदर्भात, **विशेष उल्लेखनीय बाब ही की, पाकिस्तानच्या कराचीतून सूत्र हालवत, भारतातून फुटून मिझोरामला स्वतंत्र-राष्ट्र घोषित करणाऱ्या 'मिझोराम नॅशनल फ्रंट'चा लाल डेंगा, यांना चीन-पाकिस्तानच्या चिथावणीने केल्या ऐतिहासिक चुकांचा प्रचंड पश्चाताप होऊन उपरती झाली होती. त्यांनी, भारतीय राज्यघटनेवर आपली परिपूर्ण निष्ठा व्यक्त केली व लंडनहून ते भारतात परतले. हवाईदलाच्या हल्ल्यात जवळपास १०० मिझोरामी नागरिक मारले गेले होते, नागरी मालमत्तेचंही मोठं नुकसान झालं होतं... त्याच्या खाणाखुणा मिझोरामी जनतेच्या मनावर स्वाभाविकच उमटलेल्या होत्या व युनोसारख्या आंतराष्ट्रीय-स्तरावरही त्याची प्रतिक्रिया उमटली होतीच.**

**...या सर्वांचा साकल्याने विचार करुन, तत्कालीन पं. स्व. राजीव गांधींनी मोठ्या मनाने, तत्कालीन काँग्रेसचे मुख्यमंत्री 'ललथन हवला' यांना राजीनामा द्यायला लावला व १९८७ मध्ये झालेल्या मिझोराम राज्य-विधानसभा निवडणुकीत 'लाल डेंगा', हे 'मिझो नॅशनल फ्रंट' (MNF) चे मुख्यमंत्री बनले (ते पुढे फार काळ जगले नाहीत) आणि तिथूनच पुढे खऱ्याअर्थाने मिझोरामची, भारताचा एक अविभाज्य घटक म्हणून, 'शांति आणि समृद्धी'कडे खरी वाटचाल सुरु झाली... ती एवढी की, साक्षरता आणि सुशिक्षितता याबाबत भारतात नंबर एक, म्हणून गणल्या जाणाऱ्या केरळच्याही मिझोराम दोन पावलं आज पुढे आहे!**



'भाजपा आयटी-सेल'च्या (IT-CELL) माध्यमातून आपल्या जातधर्म-विद्वेषी सडक्या मेंदूचा, आर्थिक-राजकीय लाभासाठी घाऊक 'सेल' (Sale) लावून बसलेल्या, नीचोत्तम 'अमित मालवीय' याच्या तालमीत... कुणीही व्यक्ति 'संसर्गजन्य' होऊन जेव्हा, रोगट-सडलेले विचार घेऊन बाहेर पडते; तेव्हा, ती भाजपाई व्यक्ती, कुठल्याही मोठ्या पदावर असो वा नसो... सध्याच्या, अशांत-दंगलग्रस्त मणिपूरच्या पार्श्वभूमीवर, मणिपूरमधल्या भाजपाच्या दुष्कर्मांची अंडीपिल्ली झाकण्यासाठीच, तत्कालीन परिस्थितीचा काहीही संदर्भ न देतात, मिझोरामवरील तत्कालीन बॉम्बफेकीवर अत्यंत बेजबाबदारपणे 'गरळ' ओकत असते!

**• इंदिरा गांधींनी वेळीच 'लष्करी-कारवाई' करुन मिझोराम भारताचा अविभाज्य भाग म्हणून निग्रहपूर्वक नुसताच टिकवून धरला असं नव्हे; तर, त्याला पूर्णतया भारतीय-प्रवाहात आणला... तो खरा 'सर्जिकल-स्ट्राईक' होता... ती कुठलीही 'फिक्स्ड् मॅच' नव्हती अथवा त्यात, २०१९च्या लोकसभा-निवडणुका जिंकण्यासाठी (काश्मीरचे भूतपूर्व राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्या कथनानुसार) तब्बल ४० जवानांचं रक्त तर सोडाच, उलटपक्षी एकाही जवानाचं रक्त सांडलेलं नव्हतं!**

**• इंदिरा गांधींनी १९७५ साली उत्तम राजनैतिक भूमिका बजावत 'सिक्कीम' भारताशी जोडून दाखवला (जनता, मिझोरामची असो वा सिक्कीमची, काँग्रेसच्या राजवटीत त्यांना भारतात रहाण्यात 'आश्वस्त' वाटत होतं)... तुम्ही, निदान आता कुठल्याही प्रकारे (राजनैतिक वा लष्करी कारवाई करुन) पाकव्याप्त-काश्मीर ताब्यात घेऊन दाखवा, मगच फुशारक्या मारा!**

**• इंदिरा गांधींनी 'बांगला देशा'ची निर्मिती घडवून पाकिस्तानचे दोन तुकडे करुन दाखवले व पाकिस्तानला कायमचा 'पंगू' बनवला! तुम्ही तर, चीनने आपले लचके तोडले, तरी वल्गना करण्यापलिकडे काहीही करत नाही आहात.**

...म्हणूनच, इंदिरा गांधी, या भारतासाठी चंडिकेसारख्या पराक्रमी पंतप्रधान ठरल्या... भूतपूर्व पंतप्रधान अटल बिहारी तर, इंदिरा गांधींना संसदेत जाहीररित्या 'दुर्गेचा अवतार' म्हणाले होते, हे एवढ्या लवकर विसरलात?

**...१९६६ च्या मिझोरामवरील, 'आखरी रास्ता' म्हणून, योग्य समयी पोलादी-निर्धाराने केलेल्या 'सर्जिकल-बॉम्बफेकी'ला जेव्हा, तुम्ही कलुषित मनाने आणि 'मालवीय' वळणाच्या, जातधर्म-विद्वेषी चिखलातच नव्हे; तर, थेट 'मालवीय-विष्ठे'त मळलेल्या पूर्वग्रहदूषित सडक्या अंतःकरणाने तुम्ही दूषणं देता... तेव्हा, ही भाजपाई लोकं, इंदिरा गांधींना 'दुर्गा' म्हणणाऱ्या (त्यांचं त्यांनाच निरतिशय आदरणीय असलेल्या) स्व. अटल बिहारींच्या व्यक्तित्वाचा घनघोर अपमान करत असतात... पण, या सडक्या मेंदूच्या अनपढ-गँवार लोकांकडे एवढा विवेक-विचार कुठून असणार???**

...तेव्हा आता, वाचकांनीच इंदिरा गांधींच्या त्या मिझोरामवरील अतिरेकी अड्ड्यांवर व इतर विशिष्ट ठिकाणांवर बॉम्बफेक करण्याचा निर्णय योग्य होता किंवा कसा, याचा निवाडा आपल्या विवेकबुद्धीने निवाडा करावा, हे उत्तम... धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ‘‘बेकायदेशीर ‘हुकूमशाही’ व ‘आणीबाणी’कडून कायदेशीर ‘हुकूमशाही’ व ‘आणीबाणी’कडे....’’

...ज्याक्षणी, तुम्हाला या देशाचे पंतप्रधान नाटकीय ढंगाने सांगतील की, ‘‘तुम्हाला मोगल–ब्रिटीशकालीन गुलामीच्या मानसिकतेतून ‘स्वतंत्रता’ बहाल केली जात आहे...’’ त्याक्षणी, छातीठोकपणे समजा की, ‘‘तुमच्या सध्याच्याच ‘गुलामगिरी’च्या ‘भांडवली–शृंखलां’मध्ये अधिकचं ‘पोलाद’ ओतलं जाणार आहे...!!!’’



‘‘लोकशाही–जगतातल्या कुठल्याही देशात नसलेले दमनकारी–कायदे आणताना, भारताला ‘मदर ऑफ डेमॉक्रसी’ म्हणणारे, प्रत्यक्षात ‘फादर ऑफ डिक्टेटरशिप’ आहेत!’’

**...इति, कायदेतज्ज्ञ कपिल सिब्बल**

आजचा गांधी–नेहरु–वल्लभभाई–सुभाषचंद्रांच्या काँग्रेसने मिळवून दिलेला ‘स्वातंत्र्या’चा ७७ वा आणि भाजपाई–भांडवली ‘गुलामी तथा पारतंत्र्या’चा १० वा वर्धापनदिन एकीकडे...आणि, मणिपूर–हरियाणाच्या गदारोळात दुसरीकडे, कमालीच्या गुप्ततेत देशाची बेकायदेशीर ‘हुकूमशाही’कडून कायदेशीर ‘हुकूमशाही’कडे व बेकायदेशीर ‘आणीबाणी’कडून कायदेशीर ‘आणीबाणी’कडे अत्यंत धोकादायक वाटचाल सुरु आहे...!!!

**‘इंडियन पीनल कोड–१८६०’च्या जागी ‘भारतीय न्यायसंहिता–२०२३’, ‘क्रिमिनल प्रोसिजर कोड–१९७३’च्या जागी ‘भारतीय नागरिक सुरक्षा संहिता–२०२३’ आणि ‘इंडियन इव्हिडन्स क्ट–१८७२’च्या जागी ‘भारतीय साक्ष अधिनियम–२०२३’... अशा तीन नव्या ‘कायदा–संहिता’ प्रस्तावित आहेत.**

आजवरची, भाजपा सरकारची धोरणं वा कायदा–बदलाबाबतचे कुठलंही पाऊल... हे हरिश्चंद्राच्या नव्हे; तर, शकुनीच्या पादुका घालूनच टाकलं गेलंय, ज्यात कधिच जनसामान्यांचं निर्भेळ भलं नव्हतं आणि भविष्यातही नसेल... **‘‘मुँह में अयोध्या का राम और पेट में लंका का रावण’’, हीच यांची ‘कपटनीति’ राहिलेली आहे... जागतिक तापमानवाढीच्या या काळात... अन्नधान्य, कडधान्यं, फळपिकं धोक्यात आली असली; तरीही, यांच्या ‘बीजेपी–आयटी सेल’ व ‘गोदी–मिडीया’ ब्रॅण्डच्या अफवांची, फसवणुकीची ‘हायब्रिड पिकं’ मात्र, जोमानं देशभर फुलतायत, फळतायत!**

तथाकथित मोगलकालीन गुलामीची किंवा ब्रिटिशकालीन वसाहतवादी (Colonial Era) मानसिकता संपवण्याची बेमालूम बतावणी जेव्हा केली जाते... तेव्हा, शहरं (गुजराथच्या, ‘अहमदाबाद’चं मोगली–नाव मात्र, अजून तेच कसं?), मैदानं, रस्ते, वास्तू बागबगीचे यांची नुसती नावं बदलून भागत नाही. त्यात, ‘‘आम्ही ‘दंडा’ऐवजी, ‘न्याय’ देत आहोत’’ अशा भूलथापा देत... कायदे बदलून हुकूमशाहीचा नंगानाच, या देशात चालू केला जातो. देशात, आता तेच अधिक आक्रमकपणे घडणार आहे...

**अगदी न्याय–यंत्रणेतील मॅजिस्ट्रेट, उच्च–सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश, सरकारी अधिकारी, सार्वजनिक क्षेत्रातील अधिकारीवर्ग, बँकर्स, सीबीआय/ सीव्हीसी/ईडी/कॅग इ.मधील अधिकारीवर्ग (हे सारेच, ‘सार्वजनिक–सेवक’ किंवा** Public Servant **व्याख्येत मोडणारे)... यांना, हेतूत:, कायदाबाह्य चुकीचा निर्णय (अंतरिम–निर्णय असला तरीही) किंवा तपास–अहवाल दिल्याबद्दल (हे सगळंच अर्थातच, सरकारच ठरवणार) तब्बल सात वर्षांच्या अघोरी शिक्षेची आणि शिवाय, दंडाची तरतूद, नव्या तीन कायद्यांच्या संहितेत केली गेलीय...**

तसेच, नव्या ‘भारतीय नागरिक सुरक्षा संहिता–२०२३’ यामध्ये, पोलिसांना सध्याच्या, जास्तीतजास्त १५ दिवसांऐवजी, ६० ते ९० दिवस, आरोपीला पोलिस–कोठडीत डांबून ठेवण्याची मुभा दिली जाणार आहे. थोडक्यात, देशात ‘लोकशाहीराज्य’ नव्हे; तर, डॉल्फ हिटलर प्रमाणे, ‘पोलिसराज्य’ आणण्याची, ही पूर्वतयारी होय.

कुठल्याही आंदोलनात दुर्दैवाने हिंसा घडलीच किंवा भाजपाई–हस्तकांनी जाणिवपूर्वक घडवली; तर, तुम्हाला ‘अतिरेकी’ समजून कठोर कारवाई करण्याची मुभा देणाऱ्या दमनकारी–कायद्यांचा यात अंतर्भाव ...(पान क्र. १० वर)



*‘आम आदमी पार्टी’चे (आप) महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष धनंजय शिंदे यांनी, ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांची, त्यांच्या ठाणे शहरातील, शुभारंभ कॉम्प्लेक्स, मानपाडा येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली. यावेळी ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष व ‘धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा’चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, शिवकालीन अभ्यासक व ‘Kimantu Live’ या नावाच्या चॅनेलमुळे सध्या गाजत असलेले ‘यू–ट्यूबर’ श्री. किमंतु ओंबळे–सरकार व ‘आप’चे पदाधिकारी मधुकर फर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.*

*याप्रसंगी आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसंदर्भात चर्चा झाली. २०२४ची लोकसभा–निवडणूक ही, अत्यंत महत्त्वाची असून, दुर्दैवाने देशात पुन्हा मोदी सरकार स्थापन झालेच तर, भारतातील ‘लोकशाही व भारतीय संविधानिक पाया’ उध्वस्त होईल... त्यासाठीच देशातील सर्व विरोधी पक्षांनी, राष्ट्रीय पातळीवर सांघिकपणे ‘INDIA’ बिरुदाखाली उभी केलेली राजकीय ताकद, २०२४ च्या लोकसभा–निवडणुकीत मजबुतीने टिकवून धरली; तर, मोदी–शहांची जुलमी सत्ता उलथवून टाकणे सहजशक्य होईल, यावर राजन राजे व धनंजय शिंदे यांचे एकमत झाले.*

# शरदराव, अजितदादा (दोघांमुळे, तमाम मराठी जनता मात्र, 'फजितदादा') गुप्त बैठकीच्या निमित्ताने....

शरद पवारसाहेबांना, संपूर्ण महाराष्ट्राचा 'नेता' वा 'जाणता राजा' वगैरे म्हणणं, हा सामान्य मराठी माणसांसाठी (आणि अर्थातच, प्रामुख्यानं महाराष्ट्रातील बहुसंख्य 'मराठा' जातीसाठी) एक अतिशय क्रूर विनोद आहे... तसा तो, कायमच होता व आजही आहेच (सध्याच्या, महाराष्ट्रातील अत्यंत संतापजनक व घृणास्पद राजकीय घडामोडी अजून वेगळं, काय दर्शवतात?... शरदरावांनी जी आपल्या हयातीत विषवल्ली पेरली, तिचं आज भरभरुन उगवताना सर्वत्र दिसतेय!)...



**शरदराव, नेता म्हणून मोठा वगैरे असण्यापेक्षा, त्या असण्यातला क्रूर 'विनोद' मोठा आहे!**

कुणाची 'व्यक्तिगत कामं' करण्यात, शरदराव कायमच आम्हाला मरमर मेहनत घेत, जराही कसूर न करताना दिसले... पण, ती 'व्यक्तिगत कामं' देखील (जी करणं, सत्ता हाती असताना, तसं खूप सोपं असतं) प्रामुख्यानं, जी मंडळी विविध कारणांनी 'प्रभावशाली' असतात उदा. पैसा किंवा मतं मिळवून देऊ शकणारे स्थानिक राजकारणी सुभेदार-सरदार; तसेच, निवडणुकीच्या राजकारणात मनगटशाही गाजवू शकणारे धटिंगण आणि ज्या मदत करण्यातून, मोठी प्रसिध्दी मिळू शकते अशा प्रथितयश साहित्यिक, सिनेक्षेत्राशी संबंधित, खेळाडू, कलाकार मंडळी इ. चीच, त्यांच्याकरवी तत्परतेनं होताना दिसली... मात्र, भ्रष्टाचार-निर्मूलन व भांडवली-व्यवस्थेच्या मुळावर उठणारी म्हणजेच, कामगारवर्गाला सुखसमाधान-सुरक्षितता-सन्मान देणारी; तसेच, दिल्लीत अरविंद केजरीवालांनी अल्पावधीत केली तशी, शिक्षण-आरोग्य क्षेत्रात मूलभूत स्वरुपाची कुठलीही 'सार्वजनिक कामं', करण्याचा शरदरावांचा साधा प्रयत्नही कधि दिसला नाही... ते कायमच, 'भांडवली-व्यवस्थे'च्या हितासाठीच कार्यरत राहताना महाराष्ट्राने पाहीले.

विविध 'संस्था', विशेषतः, सहकारी क्षेत्रात ('सहकारातून स्वाहा:कार', त्यातूनच उभा राहीला) उभारुन, यथावकाश त्यांची आपल्या राजकीय व आर्थिक स्वार्थासाठी 'संस्थान' बनवण्यात... तसेच, दुसर्यांनी मेहनतीने उभारलेल्या संस्थांवर कपट-कारस्थानं रचून ताबा मिळवण्यात... शरदरावांसारखा अत्यंत वाकबगार-कुटील नेता, देशात शोधून दुसरा सापडणं मुश्किल! कदाचित, या त्यांच्या (अव)गुणधर्मामुळेच पं. नरेंद्र मोदींना, ते 'राजकीय गुरु' वाटत आलेले असावेत.

**शरदराव, महाराष्ट्राचे अनेकदा मुख्यमंत्री व देशाचे सर्वात अधिककाळ केंद्रीय कृषीमंत्री असतानाच महाराष्ट्रात, हजारोंनी छोट्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या न थांबता होत रहाव्यात आणि त्या होत असताना बड्या जैन, गुजराथी, मारवाडी भांडवलदार धेंडांशी त्यांचं कायमच सूत जुळलेलं असावं आणि त्यातूनच, छोट्या शेतकऱ्यांच्या हिताबाबत त्यांच्याकरवी प्रतिकूल भूमिका घेतल्या जाव्यात... याचा, राजकीय-समजेच्या दृष्टीकोनातून सुमार वकूबाच्या सामान्य मराठी-माणसाला कधि मनोमन संताप आला नाही. उलट हा महाराष्ट्र (पश्चिम महाराष्ट्रातून प्रामुख्याने का होईना), शरदरावांना कायमच आमदार-खासदारांची हुकमी रसद पुरवत राहीला व तेवढा तेवढा महाराष्ट्र, स्वत:चाच घात करत राहिला.**

याचीच दुसरी आवृत्ती म्हणजे जैन, गुज्जू, मारवाडी भांडवलदार धेंडांशी शरदरावांची छुपी वा उघड स्वरुपात असलेली युती म्हणा, 'अर्थपूर्ण' घनिष्ट संबंध म्हणा किंवा गुन्हेगारी स्वरुपात मोडावी, अशी 'हातमिळवणी' म्हणा... ती तशी असल्यानेच, जैन-गुजराथी-मारवाडी बडा भांडवलदारवर्ग व परदेशातील बहुराष्ट्रीय कंपन्या... महाराष्ट्रात 'कंत्राटी-कामगार पद्धती'ची अवदसा सहजी आणू शकल्या व त्यातील गुलामगिरी-नवअस्पृश्यतेची 'विषवल्ली' सर्वप्रथम महाराष्ट्रातून रुजवायला सुरुवात करुन; मग, देशभर त्या पसरवू शकल्या (महाराष्ट्रातील एकूणएक 'कामगार मंत्री' कायम राष्ट्रवादीचेच).

...लक्षात घ्या (जे अजूनही, गोरगरीब मराठा-समाजाच्या ध्यानी येत नाही), 'उघड बया, दार उघड' असं म्हणतं आलेल्या, त्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'तल्या 'अवदसेच्या आगमना'तच, मराठा-समाजाला महामोर्चे काढावे लागण्याच्या करुणाजनक व अपमानास्पद परिस्थितीची बीजं रोवली गेली होती!

मुळातूनच, श्रीमंत मराठ्यांसाठी व धनाढ्य जैन, गुजराथी, मारवाडी भांडवलदार धेंडांसाठी (त्यात पुढे, बहुराष्ट्रीय-कंपन्यांच्या व्यवस्थापनांची भर पडली) खऱ्या अर्थाने 'जाणता राजा' (सामान्यांसाठी मुळीच नव्हे!) असणारे... 'श.प.' ('श'रद 'प'वारसाहेब) म्हणजे, सामान्य मराठा-समाजासाठी एकप्रकारे 'शाप' ठरले, ते असे!

...*राजन राजे* **(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**




**आजचं 'लक्ष्य' टिळक-पुरस्कार नव्हतंच; तर, २०२४-निवडणुकीचा प्रचार आणि प्रसार होतं... त्यामुळेच, भाषणाला उपस्थित बिगर-बीजेपीवाल्या नेत्यांच्या कारभारावर उघड टीकेची धार धरत... एकप्रकारे त्यांचा उपमर्दच करण्यात आला व त्या बड्या नेत्यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून, स्वत:हून हात दाखवून अवलक्षण करुन घेतलं!**

...*राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

'धर्मराज्य पक्षाध्यक्ष' राजन राजे प्रस्तुत

'शिवकालीन वतन व्यवस्था'

*'धर्मराज्य पक्षाध्यक्ष' राजन राजे प्रस्तुत, प्रख्यात शिवव्याख्याते किमंतु ओंबळे-सरकार यांनी सादर केलेल्या, शिवकाल या सदराखालील, 'शिवकालीन वतन व्यवस्था' याबाबत, अत्यंत महत्त्वपूर्ण व सर्वसामान्यांच्या ज्ञानात भर घालणारी आणि सर्वसामान्यांना ज्ञात नसलेली, अभ्यासपूर्ण अशी व्हिडिओ-मालिका यूट्यूबवर सुरु करण्यात आलेली आहे. ही व्हिडिओ-मालिका पाहण्यासाठी, आपण खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करुन, सदर व्हिडिओ-मालिका पाहू शकता. या व्हिडिओ-मालिकेचा सर्वदूर प्रसार करण्यासाठी, सदर व्हिडीओ-लिंक जास्तीतजास्त प्रमाणात व्हॉट्सअॅप व फेसबुकवर लाईक व शेअर करावी*





*प्रस्तुतकर्ता*
*राजन राजे*
*(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*



*शिवव्याख्याते*
*किमंतु ओंबळे-सरकार*

youtube.com/@KimantuLive

## कायदेशीर 'हुकूमशाही' व 'आणीबाणी'कडे....''

..(पान क्र. ८ वरुन)

असल्याचा, कपिल सिब्बलांसारख्या कायदेतज्ज्ञांचा दावा आहे... याचाच अर्थ, यापुढे, झालेल्या अन्याय-अत्याचार; तसेच, लैंगिक वा आर्थिक शोषणाविरुद्ध लोकशाहीमार्गाने रस्त्यावर उतरणं (आठवा, हरियाणा-पंजाबमधील शेतकऱ्यांचं तसेच, महिला-पहेलवानांचं चिरडलं गेलेलं दिल्ली-आंदोलन), हा सरकारी मनमर्जीनुसार फार मोठा गुन्हा ठरवला जाऊ शकण्याचा धोका उभा ठाकला आहे... म्हणजेच, **देशात एकाबाजुला अयोध्येत 'राममंदिरा'ची उभारणी करायची; पण, दुसऱ्या बाजुला देशात 'राममंदिरा'तली 'पवित्र-शांतता' नव्हे; तर, मुडद्या-फरासांच्या स्मशानातली 'अपवित्र-शांतता' आणू पहायची, असं या तथाकथित हिंदुत्ववाद्यांचं धोरण दिसतंय... तरीही, लोक हो, ''जय बोलो, हिंदुत्व की और हिंदुराष्ट्र की''!**

**एवढंच नव्हे; तर, बाहेरील देशात खलिस्तानी हिंसक कारवाया करणारे आणि विदेशातील लोकशाही-संस्थांमध्ये जाऊन भारतीय सरकारविरोधी वक्तव्य करणारे... हे, 'अतिरेकी', या एकाच मापाने मोजले जाणार आहेत (प्रस्तावित भारतीय न्यायसंहिता-२०२३, कलम १११).**

**अशी परिस्थिती असेल; तर मग, कुठला मॅजिस्ट्रेट, कुठला न्यायाधीश, कुठला सरकारी अधिकारी... सत्ताधाऱ्यांच्या दमनकारी-दबावाखाली न येता, निर्णय देऊ शकेल किंवा घेऊ शकेल?**

जसे, यांच्या कह्यात आलेले भ्रष्टाचारी-राजकारणी, 'भाजपाई-गंगे'त न्हाऊन पवित्र होतात आणि कह्यात न आलेले, असले-नसलेले भ्रष्टाचारी तुरुंगात लटकतात... तोच भयानक उत्पात, या देशात न्यायाधीश-सरकारी अधिकाऱ्यांबाबत चालू होईल.

**कामगार-कर्मचारीवर्ग जसा, निलंबन वा कामावरुन काढून टाकलं जाण्याला प्रचंड घाबरतो आणि 'कंपनी-दहशतवादा'पुढे** (Corporate-Terrorism) **मान तुकवतो... तिचं परिस्थिती पोलिस अधिकारी, न्यायाधीश, सनदी अधिकारी यांच्या बाबतीत होणार (आणि, इथे तर नोकरी जाण्यासोबतच कारावासाचीही दहशत) आणि ते, 'राज्यघटने'नुसार नव्हे; तर, या हुकूम'शहां'पुढे म्हणजेच,** "Governance through Political-Terrorism" **पुढे... कमरेत झुकून-वाकून, बरहुकूम निमुटपणे काम करत रहाणार!**

हे आक्रित घडवताना सार्वत्रिक विरोध होऊ नये व हक्काची उत्तर-भारतीय मतं गमवावी लागू नयेत म्हणून, कायद्यांच्या नावाचं 'हिंदीकरण' करुन उत्तर-भारतीय हिंदीभाषिक-जनभावनेला (Cow-Belt) हात घालणं सुरु आहे. त्यातून छुप्यारितीने, गुजराथी-भाषिक बड्या भांडवलदारांना, तमाम गोरगरीब भारतीय जनतेला (त्यात, गुजराथमधला गुजराथी-भाषिक गोरगरीब आदिवासी-दलित समाजदेखील आलाच) लुटण्यासाठी, लुटत रहाण्यासाठी देशात रान मोकळं केलं जाणार आहे (मणिपूर, अजून कशासाठी जाळलं जातंय?). त्याकामी, इतकी वर्षे रुळलेल्या इंग्रजीतील कायद्यांच्या परिभाषेचा वरकरणी, हिंदीत अनुवाद करुन... 'हिंदी'भाषेच्या ढोंगी 'गौरवा'आड, देशाच्या 'सत्य-न्याय-निती'संपन्न 'आत्म्या'चाच खात्मा केला जातोय...

कामगार-कर्मचारीवर्गासाठी 'काळी कामगार-संहिता' याच मोदी-शहा भाजपाई सरकारने लादताना; याअगोदरच, 'कंत्राटी-कामगार पद्धती'तील, देशभर मौजूद असलेल्या 'गुलामगिरी'च्या आणि 'नव-अस्पृश्यते'च्या लोखंडी-साखळ्यांमध्ये अधिकचं 'लोह' ओतलं आहे. त्यातून कुणी निसटूच नये कधि, म्हणून त्या अधिकच मजबूत केल्या गेल्या आहेत... त्यातलाच, हा गर्हणीय प्रकार आहे!



**तेव्हा, बड्या देशी-विदेशी भांडवलदारांच्या टाचेखाली रगडल्या जाणाऱ्या, तथाकथित 'हिंदू-राष्ट्रा'त ब्रिटीश-राजवटीपेक्षाही गुलामीतील अन्याय-शोषण-अत्याचाराचा भयंकर अनुभव घ्यायची, हौस आहे का कुणाला? 'रामा'चा आणि 'रामराज्या'चा पुरस्कार करता ना? मग, रामराज्यात, हे असले लोकभावना ठोकरुन लावणारे, 'दरबारी-दहशतवादी' धंदे रामाने चालवले होते कधि? रामाने तर, एका क्षुद्र धोब्याच्या, आपल्यावरच्या टीका-टिपणीला नको तेवढं मनावर घेत... आपल्याच प्राणप्रिय पत्नी सीतेवर; म्हणजेच, पर्यायाने स्वतःवर, मोठा अन्याय केला होता. रामासारखं प्रेमळ, सत्यनिष्ठ, आरपार पारदर्शी, समंजस व्यक्तित्व शोधून सापडणं कठीण... आणि, उठसूठ रामाचा जयघोष करणारे, एवढे संवेदनशून्य हुकूम'शहा' निपजावेत?**

...कुठल्याही व्यक्तिचा, कुठल्याही समाजाचा किंवा कुठल्याही देशाचा 'आत्मा', हा संघर्षातूनच घडत असतो! अन्याय-अत्याचार-शोषणाविरुद्धची सनदशीरमार्गाने संघर्ष करण्याची लोकशाहीतली नैसर्गिक-जनभावनाच जबरदस्तीने मारुन टाकण्याचा हा 'भांडवली-कट' आहे... इस्त्रायलचे पंतप्रधान नेत्यान्याहूंच्या चार नव्हे, चारशे पावलं पुढे, हे दिल्लीश्वर हुकूम'शहा' आहेत!

...विचारा त्यांना, ब्रिटिशांच्या गुलामगिरीत काय वेगळं घडत होतं? जालियनवाला बागेत शेकडो लोकांना वेचून वेचून गोळ्या घालणारे पोलिस, आपल्याच भारतीय रक्ताचे होते... त्यातली, एकही गोळी ना जनरल डायरने झाडली होती, ना कुठल्या गोऱ्या सोजिराने झाडली असावी! **ब्रिटीश-राजवटीत पोलिसांना, कुणालाही बेमुदत अटक करण्याचं उन्मुक्त 'स्वातंत्र्य' होतं आणि त्यामुळेच, भारतीय जनता 'पारतंत्र्या'त खितपत पडली होती. त्या 'पारतंत्र्या'च्या शृंखला तोडण्यासाठी लो. टिळक, म. गांधी, पं. नेहरुंसह असंख्यांना कित्येक वर्ष ब्रिटीशांच्या तुरुंगात कंठावी लागली... भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, मंगल पांडे, चापेकर बंधू, बाबू गेनू , नंदुरबारचा शिरीषकुमार यासारखे अनेक नरवीर देशासाठी बलिदान देते झाले.**


...पण, आजच्या घडीला भाजपाई 'सैतान', कायद्याची कुऱ्हाड हाती घेऊन मोकाट सुटू पहातोय, रात्र वैऱ्याची आहे!

ज्यांनी, स्वातंत्र्य-चळवळीत कधि भाग घेतला नाही... उलटपक्षी, स्वातंत्र्य-चळवळीचा अवसानघातच केला... त्यांचीच पिलावळ, पुन्हा आपल्याला 'पारतंत्र्या'च्या जोखडाकडे नेऊ पहातेय. असे कायदे संमत झालेच; तर, देशाची घटनात्मक-संरचना ढासळून पडायला सुरुवात होईल... याअगोदरच, देशातील अनेक घटनात्मक व लोकशाहीतील संस्था, मोडीत काढल्या गेल्या आहेत. आता देशातील न्याय-नीतिमत्ता, सत्यप्रियता यांची थडगी उभारली जाण्यासाठी, हे 'कायदे-बदल' करुन खड्डे खणून तयार केले जात आहेत.

**''सत्यमेव जयते'', हे देखाव्यासाठी देशाचं जे ब्रीदवाक्य आहे, ते तसंच ठेवलं जाईल... मात्र, 'ट्रोल-आर्मी'चा बादशहा, अमित मालवीयच्या तालमीत तयार झालेल्या, भाजपाई थापेबाजांच्या ढोंगी-बनावट हिंदुराष्ट्रात... 'असत्यमेव जयते', हेच प्रत्यक्ष व्यवहारातलं ब्रीदवाक्य बनेल... पण, ते 'नागडं सत्य', उघडपणे तुम्हाला कधिच सांगितलं जाणार नाही. हिंदीभाषेच्या कैवाराचा 'गांजा', दांभिक हिंदुत्वाच्या धर्मविद्वेषाची 'अफू' आणि मोगल-ब्रिटीश राजवटीच्या खाणाखुणा पुसण्याच्या हाकाटीची अंमली ड्रग्जची नशा.... 'भाजपा आयटी-सेल बादशहा', असलेला मालवीयांचा समाजघातकी 'अमित', तुम्हाला 'अमिट'पणे निरंतर पाजत राहील!**

...तेव्हा, ७७ व्या स्वातंत्र्यदिनाच्या कैफात मित्रा, तू झोपेतच गाडला जाण्याअगोदर 'जागा' हो; अन्यथा, अन्याय-अत्याचार-शोषणाविरुद्ध रडण्या-ओरडण्यासाठी देखील, तुला देशात 'जागा' शिल्लक ठेवली जाणार नाही...!!!

***...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**




*खाऊन खाऊन माजलेत ४० बोके, वरतून म्हणतात सगळंच ओके!*
*बोला, हायेत कुठं ते ५० खोके... डचमळत्या ट्रेनच्या धडाला 'ट्रिपल-इंजिन'चे डोके!*
*'बारामती' वाले के गले पडा, नागपूरकर दूजा,*
*आधी होता 'खरबूजा... मग, 'सरकारपाड्या' टरबूजा!*
*'कले कले'ने नाय, 'किलो किलो'ने वाढणं काय ते थांबेच ना...*
*दादांची रमी, दिल्लीवाल्या 'जोकर' वाचून काहीकेल्या जुळेच ना!*
*...गद्दारीचा भोज्या, भोज्यातून 'मंत्रीपद',*
*आलं आलं जवळ 'बारामती स्टेशन'...*
*म्होरक्याला लईच आलंय बाय, 'फूल टू टेंशन'...!!!*
*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

# "भारतीय नद्यांचं पुनरुज्जीवन"



नद्या वाचविण्याकामी वरकरणी का होईना पण, 'नायका'च्या भूमिकेत वावरताना पहाण्याचं प्राक्तन मात्र, या निमित्ताने भारतीय जनतेच्या नशिबी आलयं, एवढं मात्र खरं.

**सध्या ''भारतीय नद्यांचं पुनरुज्जीवन'', हा विषय घेऊन सद्गुरु जग्गी वासुदेव यांच्या 'ईशा फाऊंडेशन'च्या वतीने औद्योगिक कंपन्यांच्या व जनतेच्या सहकार्यातून भारतभर एक फार मोठी मोहीम हाती घेण्यात आलेली आहे.... फक्त, यात चिंतन व चिंता करण्याची बाब ही की, ज्यांनी ज्यांनी म्हणून आमच्या नद्या अनधिकृत बांधकामे करुन बुजवल्या, मोठमोठी धरणं बांधून नद्या अडवल्या व कारखान्यांचे सांडपाणी सोडून नद्या मोठ्याप्रमाणावर प्रदुषित केल्या; तेच, आज ईशा फाऊंडेशनला मोठा आर्थिक सहयोग देऊन, त्या माध्यमातून नद्या वाचवण्याचा 'आव' आणतायतं! अर्थात, श्री श्री रविशंकरांच्या ''आर्ट ऑफ् लिव्हिंग''सारख्या तथाकथित आध्यात्मिक संस्थांनी (की, संस्थानांनी?) मध्यंतरी आपल्या दिमाखदार सोहळ्यासाठी 'यमुनापात्रा'ची जी दुर्दशा केली होती व त्यासाठी, त्यांना 'राष्ट्रीय हरित लवादा'ने (NGT) जो मोठा दंड आकारला होता, ते पहाता ''हे ही नसे थोडके'' असं म्हणतं समाधान मानणं क्रमप्राप्तच आहे, दुसरं काय?**

नद्या प्रदूषित व मृतप्राय होण्यात ज्यांनी, आजवर महाप्रचंड नफे (Corporate-Profits) कमवत, मोठी 'खलनायकी' भूमिका बजावलीयं... त्या 'उद्योगसम्राटांना', प्रशासकिय मंडळींना आणि 'राजकारण्यां'ना आज, नद्या वाचविण्याकामी वरकरणी का होईना पण, 'नायका'च्या भूमिकेत वावरताना पहाण्याचं प्राक्तन मात्र, या निमित्ताने भारतीय जनतेच्या नशिबी आलयं, एवढं मात्र खरं.

अनेक समाजहितैषी व पर्यावरणप्रेमी मंडळी याबाबत, फार पूर्वीपासूनच जनजागरणाची व प्रयत्नांची शिकस्त करत आहेत. परन्तु, त्यांच्याहीपैकी अनेकांची दृष्टी ''जल, जंगल आणि जमिनी'' पलिकडे जायला तयार नाही.... ''जनसंख्या आणि जीवनशैली'' या बाबी, समाजवाद्यांच्या वा कम्युनिस्टांच्या अॅजेंड्यावर येऊ शकत नाहीत; हे त्यांच्या पोथीनिष्ठ व सवंग लोकप्रियता जोपासणाऱ्या ऱ्हस्वदृष्टीचं द्योतक आहे! त्यांनाही अंति विनाशकारी 'विकासा'चं वेडं, हे लागलेलं आहेच!!!

''समुद्रवसने देवि पर्वत स्तनमंडले विष्णु पत्नी नमस्तुभ्यं पादस्पर्श क्षमस्व मे''.... अशी पृथ्वीमातेची महती गाणारी महान आध्यात्मिक परंपरा असणाऱ्या भारतातच नद्यांची ही अशी दुरवस्था व्हावी, यासारखं दुसरं आपलं 'राष्ट्रीय दुर्दैव' कुठलं? तरीही, विनाशकारी मानवकृत महासंकटाकडे पहाण्याचा आपला दृष्टीकोन आजही अतिशय त्रोटक, प्रदूषित व आत्मघातकी आहे.... **''जसं खाऊन खाऊन आपलं आरोग्य आपण बिघडवतो आणि पुन्हा खाऊन खाऊनच (औषधे वगैरे) ते बिघडलेलं आरोग्य तंदुरुस्त करण्याचा आपला विकृत प्रयत्न रहातो''** तद्वतच, **''औद्योगिक विकासातून नद्या प्रदूषित करायच्या, मृत्यूपंथाला न्यायच्या आणि औद्योगिक चक्र अव्याहत तसचं चालू ठेऊन औद्योगिक प्रयत्नांतूनच त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत रहायचं'' असं हे दुष्टचक्र, दळभद्री रक्तपिपासू-शोषक 'व्यवस्थे'नं** (Vampire-State System) **आपल्या पाठीशी लावलेलं आहे.** आम्ही फक्त लक्षणांवरच इलाज करण्यात धन्यता मानणारी, अत्यंत बेजबाबदार जमात झालेलो आहोत... मूळ रोग बरा करणं तर सोडाच; पण, त्याच्या वास्तव स्वरुपाकडे पहाण्याचीही प्रज्ञा व धैर्य आमच्याकडे नाही! आम्हाला आमच्या पुढल्या पिढ्यांच्या व अवतीभवतीच्या चराचरसृष्टीच्या भविष्याची व अस्तित्वाची काडीमात्र चिंता नाही.... आम्हाला फक्त पाश्चात्य पद्धतीने बेलगाम 'भोग' भोगत जगत रहायचयं आणि 'मुह में राम और बगल में छुरी' बाळगत भोंगळ व बोगस 'हिंदुत्वा'चे गोडवे मिडीयातून, सोशलमिडीयातून गात रहात चराचरसृष्टीचा विध्वंस करायचायं.... पृथ्वीमातेचं जागोजागी पोट फाडून अय्याशी करतच रहायचीयं! जाज्वल्य हिंदुत्व, हा 'धर्म' नसून ती सघन भारतीय आध्यात्मिक परंपरा व पर्यावरण-निसर्गस्नेही अशी शाश्वतजीवनशैली आहे.... ती अवघ्या सजीवसृष्टीच्याच मुळावर उठणाऱ्या असल्या बेजबाबदार, भोगवादी 'चंगळवादा'ला यःकिंचितही थारा देण्याची कल्पनाही सहन करु शकत नाही, एवढी तिची अमोघ विश्वव्यापकता आणि महानता आहे!

''अर्थव्यवस्था, जीवनशैली आणि जनसंख्या''... या सजीवसृष्टीवर बरावाईट प्रभाव टाकणाऱ्या, तीन सर्वात मोठ्या बाबी आहेत. पण, नद्यांचं पुनरुज्जीवन असो वा इतर निसर्ग-पर्यावरणीय संरक्षण-संवर्धनाच्या बाबी असोत, आमच्या चर्चा वा उपाययोजना, नेमक्या याच तीन मूलभूत बाबींकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करुन पुढे रेटल्या जातात! याची जबर किंमत पुढील काळात सगळ्यांनाच चुकवावी लागणार आहे. पण, तो काळ आपल्या जिविकेच्या कालखंडात येणार नाही, याची अटकळ बहुधा सध्याच्या पिढीनं बांधलेली आहे. त्यामुळेच, 'स्वांतसुखाय' अशा अधम, स्वार्थी व्यवहाराचा बेबंदपणा तिनं तसाच पुढे चालू ठेवलेला आहे. तर दुसरीकडे, पुढील पाच वर्षांनी येणाऱ्या वा कुठे ना कुठे, देशाच्या कानाकोपऱ्यात सतत चालू असणाऱ्या निवडणुकांच्या रणधुमाळीत, असल्या 'स्फोटक व संवेदनशील' विषयांना हातसुद्धा घालण्याएवढे मजबूत 'हात' (की, 'छाती'?) कुठल्याही राजकीय पक्षाची वा राजकीय व्यक्तिंची असूच शकत नाहीत (एक फक्त ''धर्मराज्य पक्ष'' वगळता!)... हे दळभद्री व किळसवाण्या भारतीय राजकारणाचं प्रच्छन्न लक्षण आहे! आणि, प्रचलित अर्थव्यवस्थेच्या ''लाभार्थी''बाबत बोलालं, तर 'व्यापक व वैश्विक' जाणिवेच्या संदर्भात सगळीचं बोंब आहे.... एका चिनी म्हणीप्रमाणे जोपर्यंत, ''शेवटची नदी सुकत नाही, शेवटचा वृक्ष वाळत नाही, शेवटचा पक्षी मरत नाही, वारा वाहणं थांबवत नाही; तोपर्यंत, माणसाला कळणारसुद्धा नाही की, तो सोनंनाणं, चांदी-हिरे-माणकं-रुपये खाऊन जगू शकत नाही!''

**निसर्गनिर्मित जीवनचक्रातला आपला विनाशकारी हस्तक्षेप थांबवणं आणि जनसंख्या व जीवनशैली कुठल्याही किंमतीवर तत्काळ रोखणं, ही काळाची गरज आहे... अन्यथा, काळाच्या जबड्यात सगळचं गडप होऊन जाईल; कारण, माणसं वितंडवाद घालत बसतील, चर्चाचर्वण करत रहातील... पण निसर्ग, मानवी-कर्मदरिद्रीपणाची प्रतिक्रिया सर्वत्र देतोच आहे** (Men argue, Nature acts!).... **परिणामतः, निसर्ग-पर्यावरणातली 'पंचमहाभूतं' खवळून उठू लागलीयतं'... भारतीय अध्यात्मात वर्णन केलेलं शिवशंकराचं 'तांडवनृत्य' सुरु झालेलं आहे.... त्या 'डमरु' वादनाचे रौद्रभीषण ध्वनीपडसाद, आपल्या बधीर कानावर कधि पडणार आणि ''जाणिवपूर्वक 'साप' समजून अजून कितीकाळ आपण 'भूई' थोपटत रहाणार''... अजून कितीकाळ आपल्याला ते परवडू शकेल ???**

***....राजन राजे*** (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष, भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी पक्ष)

# मरणात खरोखर जग जगते (भा. रा. तांबे)... FREEDOM IN DEATH...

ही कहाणी आहे, Every Man Dies Alone, या हॅन्स फॅलाडा या लेखकाने लिहीलेल्या कादंबरीवर आधारित, 'Alone in Berlin' हा चित्रपटातील... दुसऱ्या महायुद्धातल्या सर्वस्व हरपलेल्या ऑट्टो आणि अन्ना, या वृद्ध जर्मन दांपत्याची, ज्यांचा मुलगा हिटलरने फ्रान्सवर लादलेल्या युद्धात १९४० साली मारला जातो.

या दुःखाच्या वज्राघाताने जणू या दांपत्याचा कायापालटच होतो... कुणाच्या अध्यातमध्यात नसलेल्या या साध्याभोळ्या, पापभीरु वृद्ध दांपत्याचा आत्माच अंतर्बाह्य मोकळाढाक होतो आणि सगळे भयभितीचे पाश जणू गळून पडतात... एका नव्या 'आत्मिक-मुक्ति'चा तो, साक्षात्कारी अनुभव असतो.

**हिटलरचा आणि त्याच्या गोबेल्स आदी अनुयायांचा राजरोस चाललेला सततचा खोटा प्रचार, खोट्या बातम्यांचं सातत्याने प्रसारण आणि त्याला ''काळी टोपी''धारी इटलीच्या नृशंस हुकूमशहा मुसोलिनीची असलेली अभद्र साथ व त्यातून निर्माण झालेला 'नाझी-दहशतवाद'; तसेच, त्यातील क्रूरता-अमानुषता आणि त्यातून, केवळ यहुद्यांचा-ज्यूंचाच नव्हे; तर, संपूर्ण जर्मन जनतेचाच होऊ घातलेला भयंकर विध्वंस... त्यांना, त्या परमदुःखाच्या वेदनादायी चेतनास्तरावर बरोबर पूर्णपणे आकळतो.**

त्यानंतर, हाती व्रत घेतल्यासारखं ते मूळ जर्मन (ज्यू नव्हे) वृद्ध दांपत्य हिटलरला उघडं पाडण्याच्या व त्याचे दुष्ट मनसुबे, त्याची महामूर्खता त्याच्या नादी-कच्छपी लागलेल्या जनतेच्या नीट ध्यानी यावी, म्हणून जनजागृती करण्याच्या कामाला स्वतःला जुंपून घेतात.

... त्याचाच भाग म्हणून, सामान्य जर्मन जनतेच्या नजरेस पडून त्यांच्या वाचनात यावीत, म्हणून ते दोघंही नाझीविरोधी सत्य स्वरुपातील लिखाण केलेली 'पोस्टकार्ड्स' (Freedom Postcards) सार्वजनिक ठिकाणी हलकेच सोडून जायचे. त्याचा चांगलाच परिणाम जर्मन-जनमानसावर हळूहळू होऊ लागला होता. **त्या प्रचंड दहशतीच्या वातावरणात गनिमीकाव्याने असा नाझीविरोधी प्रचार करता करता, एके दिवशी अचानक एका कामाच्या ठिकाणी ऑट्टोच्या खिशातून ती पोस्टकार्ड्स घरंगळून खाली पडतात आणि जे नको व्हायला तेच घडतं... त्यांना नाझी गेस्टापो अटक करतात आणि अत्यंत निर्दयपणे गिलोटीनखाली... सत्य, न्यायाच्या प्रस्थापनेसाठीच केवळ, आपला मुलगा युद्धात मारला गेल्याचं दुःख पचवून लढणार्या, त्या ऑट्टो आणि अन्ना, या निर्भय वृद्धांचा शिरच्छेद केला जातो.**




पण, गोष्ट इथेच संपत नाही... त्या वृद्ध दांपत्याला अटक करणाऱ्या एका नाझी पोलिस अधिकाऱ्याला, त्या वृद्ध दांपत्याच्या घरात, तशा फ्रिडम-पोस्टकार्ड्सचा एक ढीगच दडवलेला सापडतो... ती सगळी तो वाचत जातो आणि त्यानंतर, ती पोस्टकार्ड्स रस्त्यावरुन जाणाऱ्या लोकांनी वाचावीत म्हणून खिडकीतून खाली फेकून देतो... एकजण ते उचलतो, वाचू लागतो आणि तिकडे तो पोलिस अधिकारी, ते पाहून आपलं सर्व्हिस रिव्हॉल्व्हर खेचून बाहेर काढतो आणि स्वतःच्या मस्तकात गोळ्या झाडून घेतो...

या 'नाट्यमय कलाटणी' (Climax) पश्चात, प्रेक्षकांच्या डोळ्याच्या कडा ओल्या करत चित्रपट समाप्त होतो.

बर्लिन शहराच्या जीर्णशीर्ण झालेल्या गल्लीबोळात अजगरासारख्या पसरलेल्या, त्या सुप्त नाझी-महाशक्तिच्या भयंकर दहशतीची तमा न बाळगता, त्या वृद्ध दांपत्याने, सर्वांचं भलं करण्यासाठी व सत्यकथनासाठी मानवतेवरील अढळ निष्ठेनं केलेल्या बलिदानाला... त्यातून, जणू न्यायच मिळाला होता!

**जर्मन सदसद्विवेक बुद्धी व शहाणपण आणि हिटलरची ज्यूविरोधी नाझी विखारी-विद्वेषी भूमिका... यातील, नैतिक संघर्ष अधोरेखित करणारा हा चित्रपट (जो आजवर भारतात कधिच दाखवला गेलेला नाही आणि आजच्या देशातील भीषण परिस्थितीत, तो दाखवला जाण्याची खूपच गरज आहे), आपल्याला १९४० च्या हिटलरी गोबेल्स-तंत्राच्या अफवा पेरण्याच्या, दिवसाचे चोवीस तास असत्यकथनाच्या अत्यंत हिणकस दशकात घेऊन जातो...**

भारतात, गेलं दशकभर आपण अशाच एका लुटालुटीच्या, अप्रामाणिक, फसव्या व जातधर्मविद्वेषाच्या वणव्यात घेऊन जाणाऱ्या कालखंडाचा अनुभव घेत आहोत; तेव्हा, या प्रत्ययकारी चित्रपटकथेपासून काही बोध, कोणी घेतील काय... हा आजचा लाखमोलाचा सवाल आहे!

***... राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

*(ता. क. : डॉ. बी. एस. मुंजे, हे हेडगेवारांचे गुरु व संघाचे प्रणेते, मुसोलिनीपासून प्रेरणा घेण्यासाठी इटलीत जाऊन आवर्जून त्याला भेटले होते)*

# मी, हरी नरके यांना नक्की कोठे miss करीन?

जनकेंद्री आर्थिक तत्वज्ञान/विचार मांडणाऱ्यांच्या मर्यादा आहेत आणि त्याला काही वस्तुनिष्ठ कारणे आहेत...



**टोकाच्या आर्थिक विषमतेबद्दल कटुता, गेली हजारो वर्षे माणसाने, माणसाच्या चालवलेल्या सर्व प्रकारच्या शोषणाबद्दल घृणा, राजकीय लोकशाहीच नाही; तर, आर्थिक लोकशाही हवी, यासाठी आग्रह धरणारी कोट्यवधी नागरिकांची मानसिकता तयार करणे, प्राथमिक काम आहे!**

यासाठी शोषितांचा इतिहास खणून काढणे, इतिहासातील कष्टकऱ्यांचे लढे आणि त्यांचे युगपुरुष यांचे, एव्हिडन्सड बेस्ड साहित्य तयार करणे, त्यांना आत्मसन्मानाचे महत्त्व सांगणे, हे काम महत्त्वाचे आहे...

हजारो वर्षांचा ढाचा, लोकशाही मार्गाने बदलायचा असेल तर, दुसरा शॉर्टकट नाही. यासाठी आजच्या स्वतः ला आधुनिक म्हणवणाऱ्या जागतिक/औद्योगिक/कॉर्पोरेट प्रणालीची मूळे, भांडवलशाहीपूर्व सामाजिक/सांस्कृतिक /जातीय/राजकीय प्रणालीत कशी आहेत हे दाखवून देणे आणि त्यासाठी सतत लिखाण/पब्लिक-लेक्चर्स/संधी मिळाली तर, सरकारी समित्यांवर जाऊन हस्तक्षेप करणे, हे दखील काम प्राथमिक आहे.

ही कामे झाली, समांतर पद्धतीने होत राहिली तरच, जनकेंद्री अर्थव्यस्वस्थेच्या मांडणीची भूक त्यांच्यात तयार होईल. ही कामे हरी नरके यांनी, स्वतःच्या तब्बेतीची पर्वा न करता, शेवटच्या दिवसापर्यंत केली.

गेल्या काही वर्षांतील, संघाच्या सामाजिक/सांस्कृतिक/सत्ताकेंद्री राजकारणाने तर, आधीचे सारे संदर्भच बदलून टाकले आहेत. ठरवून, निष्ठूर पद्धतीने बदलले जात आहेत...

**आपल्या भौतिक वंचितावस्थेचा कोट्यवधी लोकांना विसर पडेल, अशी अस्मितांची नशा त्यांनी कोट्यवधी नागरिकांना पाजली आहे. हे विष उतरवल्याशिवाय, आर्थिक राहूदे, कोणतीच इतर वैचारिक औषधे लागू होणारी नाहीत आणि ते कामदेखील हरी नरके आघाडीच्या योध्यासारखे करत होते.**

मानवकेंद्री आर्थिक मॉडेल्स (म्हणजे समाजवादी अर्थव्यवस्था) कशी असतील, सध्याच्या वित्त/मक्तेदारी अर्थव्यवस्थांमध्ये नक्की काय वाईट आहे, ते कोट्यवधी कष्टकऱ्यांच्या दैनंदिन आयुष्याला कसे येऊन भिडते, सर्वांनी अर्थकारण, अगदी जागतिक पातळीवरच्या घडामोडी का समजून घ्याव्यात, हे जे काही अर्थकर्मी सांगत असतात ते त्याचवेळी रुजेल.

**नागरिकांना तेव्हाच कळेल की, ''अरे हे जे काही आर्थिक विषयांबद्दल बोलत आहेत, ते आपल्याबद्दल आहे, आपल्या हिताचे आहे. आपल्यासारखे कोट्यवधी आहेत, आपण एकेकटे आपापले आर्थिक प्रश्न सोडवू शकत नाही; म्हणून, जे काही मिळवायचे ते एकी करुनच मिळवता येईल. धर्म-जातीवरुन, भेदाभेदामुळे आपण एक होऊ शकत नाही आणि गरीब तो गरीबच राहतोय. पर्यावरण हा तर, आपल्या अर्थव्यवस्थेचा पाया आहे आणि ते त्यासाठी टिकवले पाहिजे.''**

हरी नरके यांच्यासारखे अभ्यासू, सतत विविध प्रकारच्या सार्वजनिक व्यासपीठांवर आत्मविश्वासाने वावरणारे आणि लोकशिक्षण करणारे तरुण तयार होणे, हीच हरी नरके यांना श्रद्धांजली ठरेल...!!!

*....संजीव चांदोरकर*

# ''चांगल्याला चांगलं म्हणण्याची दानत आणि वाईटाला वाईट म्हणण्याची हिंमत''

''चांगल्याला चांगलं म्हणण्याची दानत आणि वाईटाला वाईट म्हणण्याची हिंमत'', आता पांढरपेशा पगारदार मध्यमवर्गात अंशानेही शिल्लक राहीलेली नाही, हे समाजाचं, पर्यायाने देशाचं फार मोठं दुर्दैव आहे.

शिवछत्रपती, म. फुले, म. गांधी, विवेकानंद, प्रबोधनकार ठाकरे, बाबासाहेब आंबेडकर हवेत... पण, ते दुसऱ्या कोणाच्या तरी घरात जन्माला यावेत, ही पळपुटी मनोवृत्ती आणि जोडीला 'करियर' नावाच्या आत्मकेंद्रित भूलभुलैय्यामुळे... ज्या वर्गातून, समाजहितैषी कार्यकर्ते-नेतृत्त्व जन्माला येतं किंवा यायला हवं, तो मध्यमवर्गच षंढ आणि थंड बनून बसलाय... अलिकडे तर तो, भाजपाच्या बदमाष, समाजघातकी 'आयटी-सेल'च्या व 'गोदी-मिडीया'च्या नादी लागून 'जातधर्म-विद्वेषी' व्हायला लागलाय!

**कुठलीही पोकळी रिकामी रहात नाही, हा निसर्ग-नियम आहे. कुणी ना कुणी ती, चारही बाजुंनी घुसून भरुन काढतंच... पगारदारवर्गाने किंवा यशस्वी व्यावसायिकांनी (प्रामुख्याने, वकील, शिक्षक-प्राध्यापक, डॉक्टर्स वगैरे) समाजकारण-राजकारणातील सोडलेल्या मोकळ्या जागा... तशाच पद्धतीने, समाजातल्या भ्रष्ट, ढोंगी, बदमाष व गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांनी भरुन काढल्यात. आर्थिकदृष्ट्या बऱ्यापैकी स्थिरस्थावर झाल्यावर तरी, या बुद्धिजिवी समाजघटकांनी राजकारणात रस घ्यायला नको का? पण, 'स्वांतसुखाय' अशा पार्टी-पर्यटन संस्कृतीत आकंठ बुडालेल्या त्यांनी, अप्पलपोट्या वृत्तीने राजकारणाचा त्याग केल्याचं दुर्दैवी चित्र देशात उभं आहे. त्यामुळे, चांगल्या कार्यकर्त्यांना, चांगल्या नेतृत्त्वाला समाज पारखा झालाय!**

आज जे काही, आपण अत्यंत किळसवाणं, संतापजनक, शिसारी आणणारं राजकारण पहातो, त्याचा मुळातला उगम इथेच आहे... राजकारणाची गंगा 'मैली' बनण्याचं प्रमुख कारण, हेच आहे. राजकारणात भले तुम्हाला रस नसेल; तरी, राजकारणाला तुमच्यात रस असतोच... एवढंच नव्हे, तुम्ही त्याला कितीही नाकारलंत, झिडकारलंत; तरी राजकारण तुमच्या कुलूपबंद घरादारात जबरदस्तीने घुसल्याखेरीज रहात नाहीच. अनेक सामाजिक-राजकीय-आर्थिक व निसर्ग-पर्यावरणीय समस्या... ज्या तुम्हाला आणि तुमच्या पुढील पिढ्यांना, आज घेरुन बसलेल्या आहेत; ते म्हणजेच तुमच्या घरात, तुम्ही लावलेली कडीकुलूपं तोडून राजकारणाचं घुसणं असतं. म्हणूनच, आज कुणाच्या जीवाला, या निर्मम-शोषक 'भांडवली-व्यवस्थे'त जराही थारा शिल्लक नाही. पावलोपावली सगळीचं जणं भांबावलेली-भेदरलेली दिसतात. निवृत्तीपर्यंतच काय, पण आज असलेली नोकरी उद्यापर्यंत टिकेल की, नाही याची शाश्वती संपलीय... जी मोठी राजकीय-पोकळी, याच मध्यमवर्गाने उमेदीच्या काळात राजकारणात रस न घेऊन म्हणजेच, राजकारणात प्रवेश न करुन निर्माण करुन ठेवलेली असते... त्या पोकळीचाच 'नवा अवतार' त्यांना निवृत्तीपर आयुष्यात भेडसवायला लागतो... शिलकीचा नन्नाचा पाढा असल्याने निवृत्तीनंतरची निर्माण झालेली 'आर्थिक-पोकळी' कुठल्यातरी भुक्कड नोकरी-व्यवसायाचा आसरा घेऊन भरण्याचा केविलवाणा प्रयत्न करावा लागतो.

...कधि वाटतं, एवढा कंत्राटी-पद्धतीतल्या नोकरीतला भयंकर आकांत-आक्रंदन, या मध्यमवर्गाच्या कानी पडत नसावा का? निळ्या ब्लू-कॉलरवाल्यांचा आपल्या लवलवत्या जिव्हांनी घास घेतल्यानंतर ती अवदसा, आता याच पांढऱ्याशुभ्र कॉलरवाल्यांच्या कालपरवापर्यंत सुरक्षित असलेल्या घरादारांना आग लावून भस्मसात करायला निघालीय, हे ही त्यांच्या नजरेला पडत नसेल का??... की, या मध्यमवर्गाची जीभच गळून पडलीय, मेंदू बधीर झालाय... नेमकं घडलंय तरी काय?

पण, व्यवहारात पहावं तर, घरबसल्या चहाचे किंवा दारुचे घोट घेत असताना व एरव्ही, समाजमाध्यमातून राजकारणावर टीकाटिप्पणी करताना यांच्या 'रसवंती'ला चांगलाच बहर येतोच की...

यापैकी अनेकजण, राजकारण हा बदमाषांचा अड्डा झालाय, आपलं ते काम नाही... अशी नकारात्मक संवादफेक करताना सर्रास दिसतात. पण, हे आक्रित घडण्याला मूलतः आपणच कारणीभूत आहोत, हे सोयिस्कररित्या त्यांच्याकडून दुर्लक्षित केलं जातं.

भारताच्या राज्यघटना-निर्मितीसाठी अस्तित्वात आलेल्या 'संविधानिक-सभे'त, या अशाच बुद्धिजिवी मध्यमवर्गाचं (विशेषतः, वकीलीपेशातल्या) मोठं प्राबल्य होतं; पण, स्वातंत्र्यानंतर, विशेषतः नव्वदीतल्या 'खाउजा' धोरणापश्चात (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण), झपाट्याने मध्यमवर्गाने राजकारणातून अंग काढून घेणं सुरु केलं आणि त्याची परिणती आरपार भ्रष्ट, गुन्हेगारी, बलात्कारी वृत्तीच्या 'सह्याजीरावां'चा (पक्षीय आदेशानुसार आंधळेपणाने कुठेही सही करायला एका पायावर तयार असणारे 'होयबा') संसदेत मोठ्याप्रमाणावर भरणा होण्यात झालीय.

**...मग त्यातूनच, मणिपूर जळत असतानाच महाराष्ट्राच्या कोल्हापुरात तसेच, कालपरवा हरियाणात प्रयत्नपूर्वक दंगल घडवली जाते (लक्षात घ्या तिथे निवडणूक आहे लवकरच) आणि जयपूर-मुंबई एक्स्प्रेसमध्ये एखादा चेतनसिंग हुडकून हुडकून मुस्लिमांवर बंदूक चालवतो व तरीही, त्याला सौम्य सजा व्हावी म्हणून 'गोदी-मिडीया'तून तो मानसिक-रोगी असल्याचं पसरवलं जातं... बघा, राजकारण कसं तुमच्याआमच्या घरात घुसतं ते आणि भावी पिढ्यांना बरबाद करु पहातंय ते...!!!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)


---

अवैधरित्या, बेकायदेशीर मार्गाने कमावलेला काळा पैसा, 'पांढरा' करण्याची प्रक्रिया अवलंबून त्याद्वारे, कायद्यातील शिक्षेपासून व पैशाच्या जप्तीपासून वाचण्याचा... गंभीर आरोप (मनी लॉंडरिंग) असणाऱ्या 'गौतम अदानी उद्योगसमूहा'ला केवळ, कंपनीविषयक तांत्रिक-बाबींचं उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत, फक्त आर्थिक-दंड आकारुन मोकाट सोडण्याच्या प्रयत्नात असलेल्या मोदी-शहाप्रणित भाजपाई राजवटीबद्दल बोलताना कॉंग्रेसचे नेते जयराम रमेश म्हणाले की, जर माध्यमातील या बातम्या खऱ्या असतील आणि ईडी/सीबीआयला कुठलीही कठोर कायदेशीर कारवाई करण्यास सरकारतर्फे सांगण्यात येणार नसेल; तर, 'संयुक्त संसदीय-समिती' स्थापन करुन अदानी-समूहाची चौकशी झालीच पाहीजे... अन्यथा, 'हाती असलेल्या सत्तेच्या बळावर देशाची संसाधनं लुटणाऱ्यां'चं, हे सरकार (*Kleptocracy*) असल्याचं पुरतं स्पष्ट होईल!

*(THE HINDU च्या सौजन्याने.....)*

*खरंतर, भाजपा-सरकारचा आजवरचा प्रवास... अतिश्रीमंत लोकांचं सरकार (Plutocracy) अतिशय वाईट प्रवृत्तीच्या, बिलकूल योग्यता नसलेल्या अल्पशिक्षित महामुर्खांचं सरकार (Kakistocracy) हाती असलेल्या सत्तेच्या बळावर देशाची संसाधनं लुटणाऱ्यां'चं सरकार (Kleptocracy) आत्यंतिक जुलमी-अन्यायी व जनतेचं टोकाचं शोषण करणारं सरकार (Tyrrany)... असा झालेला आहे, हे जयराम रमेशांकडून बोलण्याच्या ओघात सांगायचं राहून गेलं!*

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)




# "माणूस आणि पदार्थ, यांनी जागा बदलल्या की, ते उत्पात घडवतात...!!!"

**...पण, बिचाऱ्या मुक्या प्राण्यांची जागा बदलली की, ते मात्र नव्या जैव-वातावरणाशी जुळवून न घेता आल्याने, बव्हंशी मरुन जातात (तसं होऊ नये म्हणून, अतिशय संयत राहून शास्त्रीय पद्धतीने त्यांचं नव्या वातावरणात संगोपन करावं लागतं... राजकीय-प्रसिद्धीसाठी घिसाडघाई करुन चालत नाही) आणि भारतात दुर्दैवाने घडलंयही अगदी तसंच!**

**आपल्या कुनो राष्ट्रीय-उद्यानात मोठा गाजावाजा करुन दक्षिण आफ्रिका व नामिबियातून आणलेल्या चित्त्यांपैकी नववी चित्ता मादी, नाव धात्री, आपल्या भारतीय धरित्रीवर मरुन पडलीय... हे अविवेकी, अविचारी पाप कुणाचं? चित्त्यांना आणताना, यांचं 'चित्त', 'चित्त्यां'मध्ये होतंच कुठे? त्यांची गिधाडाची नजर 'चित्त्यां'वर नव्हे; तर, त्यातून आपलं 'राजकीय चित्र-चरित्र' कसं उठावदार बनेल, त्यातून 'गोदी-मिडीया'द्वारे प्रसिद्धी मिळवून आपली पापकृत्यं कशी झाकली जातील, याकडेच होती... याची कोण जबाबदारी घेणार आता, बोला अंधभक्त, हो?? अत्याधुनिक कॅमेरा-लेन्स लावून आपली फोटोग्राफी आणि जंगल-निरीक्षणाची खाज भागवून घेणारे, घेणार आहेत ही जबाबदारी???**

अहो, या देशात आपला राजकीय-फायदा करवून घेण्यासाठी व आपल्या खासमखास भांडवलदार-मित्रांना बक्कळ नफा मिळवून देण्यासाठी जंगलं उध्वस्त करणं सोपं जावं म्हणून, दंगली घडवून शेकड्याने माणसं मारली जातात... यांच्या राजकीय-पापकर्माने झालेल्या, त्या दोन पायांच्या मनुष्यप्राण्यांच्या 'ब्रम्हहत्यां'ची जबाबदारी, हे लोकं घेत नाहीत... तर, चार पायाच्या प्राण्यांच्या मुक्या मरण्याची, कोण हो जबाबदारी घेणार? ही काळीज नसलेल्या (खरंतरं, असलंच कुठे काळीज यांच्या देहात, तर यांना 'उलट्या काळजाची' लोकंच म्हणावं लागेल) नृशंस लोकांची जंगली जमात, 'डबल-इंजिन' लावून सध्या आपल्यावर राज्य करतेय!

**...म्हणूनच, गेले तीन महिने मणिपूर पेटलंय, कालपरवापासून हरयाणा धगधगतंय, कोल्हापूर पेटवून झालं आणि आता, कुनो-अभयारण्य न पेटवताच निष्पाप मुक्या प्राण्यांचे जीव घेतले जातायत... बा, परमेश्वरा, जो काही तू चराचर व्यापून आहेस ना, त्या तुला आमची प्राणपणाने (अगदी, प्राणांतिकच म्हण) विनंती आहे की, यांचे 'खेळ' होतायत आणि त्या क्रूर, निर्दय खेळांमध्ये किडामुंग्यांसारखे निष्पाप जीव मारले जातायत...**



तेव्हा, यांना कधिही माफ करु नकोस, यांचं अयोध्येवरचं प्रेम खोटं, यांचं 'राममंदिर' झूठं... यांना, कृपया कधिही माफ करु नकोस!

बा कृष्णा, तू रामाच्याही पुढला प्रगत अवतार... राम, हा विष्णुचा 'पूर्णावतार', तर तू विष्णुचा 'परिपूर्ण अवतार' होतास... रामानं रामायण घडवलं आणि तू महाभारत... आदर्शवत म्हणवल्या जाणाऱ्या रामाच्याही हातून काही गंभीर, अक्षम्य चुका घडल्या; पण, तू मात्र निष्कलंक ठरत, कळीकाळालाही पुरुन उरणारा असा, मानवतेला महान व्यवहार्य संदेश तुझ्या जगण्यातून व तुझ्या गीतेतून देऊन गेलास... **तुझ्याकडून आमच्या शिवछत्रपतींनी प्रेरणा घेऊन 'विश्ववंदनीय' असं, सर्वधर्मसमभाव राबवणारं, न्याय-निती प्रस्थापित करणारं 'हिंदवी-स्वराज्य' (जसं, हे लोकं आपली व आपल्या बगलबच्च्या भांडवलदार-मित्रांची उखळ पांढरी करण्यासाठीच केवळ उठसूठ, धर्मविद्वेषी 'हिंदुराष्ट्रा'चा फसवा-घातकी पुकारा करत असतात... तसलं ते, 'शिवछत्रपतींचं जनकल्याणकारी स्वराज्य', फक्त हिंदूंचं वगैरे बिलकूल नव्हतंच कधि; तर, 'सर्वधर्मीयांना सन्मानाने समान वागणूक' देणारं ते होतं) स्थापन केलं होतं...**

**हे कृष्णा, गीतेत तू जो 'कर्मसिद्धांत' सांगितलायस ना, तो यांनी धड कधि ना वाचला, ना त्याचा गाभा जाणला (तसं झालं असतं; तर, ही आजवरची त्यांची नीच-अधम-पापी कृत्यं करायला, त्यांचे हात धजावले नसते)... त्या 'कर्मसिद्धांता'चा निरर्गल, चुकीच्या पद्धतीने वापर यांच्याकरवी, बहुजन पिढ्यापिढ्यांचं अनन्वित शोषण करण्यासाठीच निव्वळ केला गेला... पण, तो तुझा जाज्वल्य स्वरुपातला 'कर्मसिद्धांत' खरा असेल, नव्हे आहेच; तर, त्याद्वारे यांना या जन्मी आणि पुढील जन्मोजन्मी केल्या कर्मांची भयंकर शिक्षा होईलच... पण, लोकसभा-२०२४च्या निवडणुकीत यांना साफ भुईसपाट करुन आम्ही, तू आमच्यावर सोपवलेलं, आमच्या वाट्याचं विधिलिखित-कार्य पूर्ण करुच... पण, त्यांचं पुढे काय काय करायचं, ते तू बघून घे बा, कृष्णा...!!!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

*''एक दारुची 'बाटली' अन् आमची*
*अवघी मराठी-संस्कृती 'बाटली'... आणि*
*त्यातूनच, अवघ्या 'कामगार-चळवळी'ची*
*संपूर्ण वाट लागली!''*

*''दारुमाजी जो बुडाला त्याचिया घरी,*
*बनूनिया पातकी मित्र, बाटलीतूनी पेयपात्री...*
*सैतान अपुल्या पाऊली, चालुनिया रे आला,*

*मगे नेमेचि जवळीक मद्यरुपी सैतानाची,*
*कामगार-मराठी तोचि, पाप्या-नितीशून्य*
*जाहला...*

*मऱ्हाठी-संसाराचा 'विस्कोट' पुरता अन्*
*चळवळीचा श्रमिकांच्या कार्यभाग तो बुडाला!*

*त्यातूनिया, जीणे नशिबी 'गुलामी'चे हो आले...*
*नरदेह दुर्लभ सद्भाग्ये होता जो लाभला,*
*'संघर्ष'विना वाया जन्माचा हो गेला*

*'नरदेह' दुर्लभ तो, कवण सद्भाग्ये लाभला...*
*मद्याच्या डोहामाजी, मद्याच्या मोहापायी...*
*जिवंत हाडामांसी, बुडवूनी पाताळी त्यासी*

*मरणाच्या दारी, कर्मदरिद्री तो असला*
*कामगार-मराठी, शांत-प्रशांत हो*
*जाहला...!!!''*

**...आजच्या मराठी-कामगाराला, विशेषतः गुलामगिरीत राब राब राबणाऱ्या, पराकोटीच्या वैफल्यग्रस्त मराठी 'कंत्राटी-कामगारा'ला... कुणी देवदूत, 'अमृतकुंभ' घेऊन 'अमृत' पाजायला जरी खाली उतरला; तरी तो विमनस्क कामगार, 'अमृतप्राशन' करायला नकार देऊन, उलट देवदूताकडे दारुची मागणी करेल, एवढी वाईट अवस्था कामगार-जगताची सध्या आहे!**

...कारण, ढुंगणाला पाय लावून कामगाराला संघर्षापासून दूर दूर पळत रहायचं असतं... आपल्या 'नामर्दपणाची नाचक्की', 'एका दारुच्या प्याल्या'त बुडवायची असते!

...जागोजागी, कंपन्या-कंपन्यांमधून असुरक्षित-दिशाहीन मराठी-कामगारांची, प्रामुख्याने कंत्राटी-कामगारांची, सध्या नशिली 'दारुने', केवढी 'दारुण' अवस्था करुन टाकलीय...???

**यात भरीसभर म्हणून, अजून एक जास्त खतरनाक धर्मसंप्रदायी नशा... सध्या, मराठी-कामगार राजरोस प्राशन करत असतो. बाबा-बुवा- तथाकथित सद्गुरु यांच्या पंथांकडे, तो दबक्या पावलांनी चालत जातो. एक नवीन संप्रदायी धार्मिक-नशा, त्याला तिथे आकृष्ट करत रहाते... आपल्या हीनदीनतेला, ही भांडवली-व्यवस्था' जबाबदार नसून त्याच्या कुंडलीतले प्रतिकूल ग्रहतारे, त्याचं कमनशीब, धार्मिक प्रार्थनांचा व जपजाप्याचा अभाव... हेच त्याच्या दुरवस्थेला कारणीभूत आहे. आणि, त्यामुळेच, संघटनात्मक पातळीवर संघर्ष न करता, कोर्टबाजी वगैरे अजिबात न करता किंवा राजकीय-संघर्ष तर बिलकूल न करता... सद्गुरु-बाबा-बुवांना शरण जाऊन निव्वळ प्रार्थना करत रहाणं, रामनामाचा जप पानोपानी लिहीणं, पोथ्यापुराणं वाचत रहाणं... हेच, आपली ही दुःस्सह परिस्थिती सुधारण्यासाठी करत रहाण्याचं, त्याच्या मनावर ठासून तिथे बिंबवलं जातं.** 'दारुच्या प्याल्या'च्या नशेपेक्षाही काकणभर सरस, अशी या विपरीत धार्मिकतेच्या अफूची घातकी नशा, कामगारांच्या रक्तात-हाडामांसात खोलवर भिनून जाते आणि कामगार-कर्मचारीवर्ग 'प्रयत्नवाद' सोडून किंकर्तव्यमूढ होत, दैववादी बनत... या रक्तपिपासू-निर्मम-शोषक व्यवस्थेचा (Vampire-State System) पुरता निरुपद्रवी 'गुलाम' बनून प्रतिकारशून्य निपचित जगत रहातो, जे या प्रस्थापित 'भांडवली-व्यवस्थे'ला नेमकं हवं असतं!

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

# तुम्ही हरयाणवी बोलीचे 'जाणकार' असण्याची नाही आवश्यकता, बस्स् फक्त हृदयात माणुसकीची 'जाण' जागी असली पाहीजे आणि न्याय-नीतिची आण धमन्यांमधून तुमच्या खोलवर रुजलेली पाहीजे!



मणिपूरच्या रक्तलांछित भळभळत्या जखमांवर, वेदनांवर, यातनांवर... संवेदनशील, हळव्या हृदयाच्या पं. नेहरुंच्या सहृदयतेनं फुंकर घालण्याऐवजी, जेव्हा नृशंस हिटलर-मुसोलिनीसारख्या विकृत-जंगली राजकीय-मनोवृत्तीनं निवडणूक-प्रचाराच्या धाटणीत कोरडंठाक भाष्य केलं जातं... तेव्हाच, एखादी देशातली हरयाणवी नारी, नारीशक्तिचं प्रतिक बनून... नारीला 'मादा' समजणाऱ्या माजलेल्या, उन्मत्त नराधमांना आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या भारतमातेच्या 'सत्ताधारी कुपुत्रां'ना, पावसाळी कडकडणाऱ्या सहस्त्र विजा... पदरात-उरात भरुन घेत आव्हान देते आणि तेव्हाच, असा काव्यरुपी वडवानल, असं काव्यरुपी तांडव उभं रहातं... खूप वाईट याचं वाटतं, या अशाच माणुसकीचं मातेरं-पोतेरं करण्याच्या अमानुष कालखंडात आमची मराठी-नारी, कुठे गणपतीचे ढोल बडवण्याचा किंवा दहीहंडीचे थर रचण्याचा सराव करताना दिसते... मोबाईलशी चोवीसतास 'चॅटिंगचाळा' करताना किंवा चातुर्मासाच्या व्रतवैकल्यात, भुक्कड कर्मकांडात बुडालेली दिसते आणि राजकारणात कार्यरत असलीच; तर, द्रौपदीचं नावगाव विस्मरणात ढकलून नीच स्वार्थासाठी सत्ताधारी धृतराष्ट्रांचं आणि अत्याचारी दुर्योधन-दु:शासनांचं 'सोयिस्कर मौन' बाळगून समर्थन करताना दिसते... ती आज देवळांच्या रांगात भर घालताना दिसतेय तर, उद्या लालबागच्या राजासकट सगळ्या सार्वजनिक गणपतींना तासनतास रांगेत उभं राहून निष्फळ साकडं घालताना दिसेल...!!!

या निमित्ताने हटकून आठवण होते ती, खालील नामदेव ढसाळांच्या विद्रोही-ज्वालाग्राही काव्यपंक्तिंची... फरक इतकाच की, वेदनांचा भळभळता सारीपाट एकदा मांडून झाल्यावर ढसाळ 'बुद्धत्वा'कडे आपल्याला वळवतात, ते तसं म्हटलं तर, अंति सर्वंकष विचार करता योग्यच!

...पण, ही अखेरीस विस्फोटक 'आदिम नारीशक्ति' आहे... मणिपुरी भीषण अत्याचारांनी प्रदीप्त झालेली ती हरयाणवी नारी, बुद्ध नाकारुन नामदेव ढसाळांच्या चार पावलं पुढे जाते आणि 'काली'चं रौद्ररुप धारण करते, ते कसं, त्याचा 'याचि देही, याचि डोळा' जिवंत-ज्वलंत प्रत्यय घ्याच....

*बोटाला सुई टोचली*
*जीव किती कळवळतो,*
*सुरे, तलवारी खसाखस*
*भोसकतात*
*कसं वाटतं असेल ?*

*साधा चटका बसला*
*माणूस किती घाबरतो,*
*साले, जिवंत जाळून*
*मारतात*
*कसं वाटत असेल...???*

*साधा पदर ढळला तर,*
*बाई किती शरमते,*
*साले, नग्न धिंड काढतात रे*

*कसं वाटतं असेल...???*
*किती यातना, किती*
*अपमान*
*किती वेदना*
*कसं सोसत असेल...???*

*आमची हर एक पिढी*
*त्यांच्या अत्याचारी*
*बलात्कारात कुथत आली,*
*परिवर्तनाच्या लढाईवर*
*प्रतिगाम्याची औलाद*
*निर्दयीपणे मुतत*
*आली...!!!*
*किती काळ हे असंच*
*चालायचं*

*किती काळ हे सारं निमूट*
*झेलायचं.....*

*आता ठरवलंय....*
*ठेवलेलं हत्यार खोलायचं*
*माणसातलं जनावर*
*आरपार सोलायचं....*

*करायची आहेत माणसं*
*आतून बाहेरुन शुद्ध*
*आणि,*
*जागवायचाय प्रत्येक*
*मनात*
*एक बुद्ध...*

# आपला न् गांधींचा, संबंध तरी काय आहे ना?

**गोळ्या घालून,**
**बदनामी करुनही**
**म्हातारा मरत नाहीये,**
**म्हाताऱ्याचं भूत...**
**या संस्थामधून**
**जिवंत आहे म्हणून,**
**या संस्थाच मोडीत**
**काढायच्या आहेत.**



आज शुक्रवार आहे... उद्या आणि परवा कोर्टाला सुट्टी. मध्ये एक दिवस सोमवारी कामकाज आणि परत दोन दिवस सुट्टी.

'वाराणसी'मध्ये काल एका जजची बदली झाली आणि नवीन जज रुजू झालेले नाहीत. याच कोर्टात, गांधीजींच्या सर्व सेवा संघांची संस्था उध्वस्त करण्याच्या बद्दल, याचिका सुनावणीला आहे.

आज उत्तर प्रदेश सरकारने बुलडोझर आणून 'सर्व सेवा संघा'च्या इमारती पाडायला सुरुवात केलेली आहे. विरोध करणारे कार्यकर्ते, याचिका दाखल करणारे कार्यकर्ते यांना अटक करण्यात आलेली आहे.

सरकारने कोर्टाला याचिकेचा निकाल लागेपर्यंत पाडापाडी करणार नाही, असं तोंडी आश्वासन दिलेलं होतं.

सुप्रीम कोर्टात जायचं म्हटलं; तरी बुधवार शिवाय, पर्याय नाहीये.

तोपर्यंत, सगळं संपलेलं असेल...

याच सर्व सेवा संघाच्या इमारतीतून सरकारने पुस्तकं, हस्तलिखितं, स्मृतिवस्तू गोळा करुन बाहेर उघड्यावर फेकून दिलेल्या होत्या.

सरकारला, इथे 'सर्व सेवा संघा'च्या जागेवर मॉल, व्यापारी-संकुल बांधायचंय.

अशीच, गांधीजींनी स्थापन केलेल्या अहमदाबादमधल्या विद्यापीठाची जागा ताब्यात घेऊन मेट्रो स्टेशन बांधायला, मित्राला देऊन टाकलेली आहे.

'साबरमती आश्रमा'ची जागा ताब्यात घेऊन तिथेही मॉल बांधायचं नियोजन आहे, जागा ताब्यात आलेली आहे.

गोळ्या घालून, बदनामी करुनही म्हातारा मरत नाहीये, म्हाताऱ्याचं भूत... या संस्थामधून जिवंत आहे म्हणून, या संस्थाच मोडीत काढायच्या आहेत.

शे-दोनशे वर्षांनी, गांधी नावाचा माणूस अस्तित्वात नव्हता, हेही तुमचे खापरपणतू वाचतील... हे लक्षात असू द्या!

पण, आपल्याला काय करायचं आहे ?

आपला न् गांधींचा, संबंध तरी काय आहे ना ?

मग, वाचा आणि थंड बसा...

भेदरट_महाशक्ती

चिखल

नीच

मरते_है_हमतुम_गांधी_कभी_मरते_नहीं

*आनंद शितोळे* यांची फेसबुक पोस्ट....

# लाख नव्हे; करोड मोलाचा सवाल, पप्पू कोण... देश-विदेशात पत्रकार-परिषदा गाजवणारा की, पत्रकार-परिषदेला घाबरणारा...???

*(सध्या युरोप- दौऱ्यावर असलेले राहुल गांधी, पॅरिसच्या 'सायन्सेस झज विद्यापीठातील विद्यार्थ्यांसमोर चर्चासत्रात भाग घेताना म्हणतायत...)*

देशात अर्थव्यवस्था-वाढीच्या (GDP) बाजारगप्पा मारल्या जातात... पण, बेरोजगारी-अर्धरोजगारीबद्दल अवाक्षरही काढलं जात नाही. गेल्या ४० वर्षात, देशातला बेरोजगारीचा दर, सर्वोच्च स्तरावर आहे.

चीन, आज जगात अग्रेसर उत्पादक-देश बनलाय... पण, तो लोकशाही पायदळी तुडवणारं दमनचक्र चालवूनच! आम्हाला चीनशी जरुर स्पर्धा करायचीय; पण, ती आमची उद्योग-नीति, लोकशाहीमार्गाने व संवेदनशीलतेनं अंगिकारुनच.

ज्यांना 'भारत-इंडिया' हा वाद, कुठलंही तार्किक कारण नसताना देशात उभा करायचाय... त्यांना, भारताचा जो काही इतिहास आहे, तो पुसून टाकायचाय (कारण, स्वातंत्र्य-चळवळीत वगैरे भाजपाई लोकांचे पूर्वज, कुठेच नव्हते... उलट, ते मोगल-ब्रिटीशांच्या सत्ताकाळात तत्कालीन सत्ताधीशांचे आश्रित व हस्तक होते).

संघ-भाजपाच्या दमनकारी हिंदुत्वाला... कुठल्याही हिंदू धार्मिक-ग्रंथांचा, हिंदू धुरीण-संत सज्जनांचा अथवा पारंपरिक हिंदू-विचारधारेचा बिलकूल आधार नाही.

'नोटबंदी'मुळे तसेच, GST जाणिवपूर्वक ज्या पद्धतीने राबवली गेली; त्यामुळे, लघू व मध्यम उद्योगांचं कंबरडं साफ मोडलं गेलं व त्यातून, मोजक्या मोठ्या उद्योगपतींकडे धनसंपत्तीचे फार मोठ्याप्रमाणावर केंद्रीकरण झालं... अदानीसारख्या बड्या उद्योगपतींना, त्यामुळेच तर रान मोकळं मिळालं.

बड्या उद्योगांना कर्जमाफी देणं, आयकरात घसघशीत सूट देणं आणि शेतकऱ्यांना मात्र, कर्जमाफी नाकारणं... यातून, संपत्तीचं केंद्रीकरण होतं. उलटपक्षी 'मनरेगा', अन्नसुरक्षा-विधेयक किंवा लघू-मध्यम उद्योगांना आधार देण्यासारख्या काँग्रेसी-धोरणांमुळे धनसंपत्तीचं जनसामान्यांमध्ये पुनर्वाटप होऊ लागलं होतं.

तळागाळातील बहुसंख्यांकांना सरकारमध्ये अथवा 'कॉर्पोरेटीय-क्षेत्रा'त कुठलाही स्वतःचा 'आवाज'च शिल्लक उरलेला नाही... वरची फारच थोडी, अगदी मूठभर माणसं, बहुसंख्यांकांसाठी कुठेतरी बसून, लोकशाही-तत्त्वाला साफ हरताळ फासून निर्णय घेताना दिसतात.

खेड्यातून शहराकडे सर्वात मोठं स्थलांतर होतंय, अशावेळेस सरकारने शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये 'जनकल्याणकारी-सरकार', या नात्याने मोठी गुंतवणूक केलीच पाहीजे (म्हणजेच, यातील बेलगाम खाजगीकरणाचं उच्चाटन केलंच पाहीजे).

अदानीसारखा उद्योगपती, देशाबाहेर गैरप्रकारे प्रचंड पैसा पाठवतो व तो परत गैरमार्गाने भारतात आणून (राऊंड-ट्रिपींग) स्वतःच्या कंपन्यांच्या शेअर्सच्या किंमती बेसुमार वाढवतो; तसेच,भारतात अनेक मोठ्या मालमत्ता खरेदी करत सुटतो... अशा अनेक बेकायदेशीर धंद्यांच्या माकडउड्या मारत झपाट्याने प्रगती करत, सर्वच क्षेत्रात घुसखोरी करताना दिसतो, हे जगभरात कधिही कुठेही घडलेलं नसून... नरेंद्र मोदी सरकारतर्फे वरच्या पातळीवरुन झालेल्या बेगुमान राजकीय-हस्तक्षेपापोटीच घडलेलं, हे आक्रित आहे... आणि अदानी, या गैरकृत्यांबाबतच्या कायदेशीर कारवाईतून वाचूच शकत नाहीत... हे दिवसेंदिवस स्पष्ट होत चालल्यानेच अदानीशी अतिशय घनिष्ट संबंध असलेले पं. नरेंद्र मोदी, अस्वस्थ होऊन 'भारत-इंडिया' असा नवा वाद अकारण उभा करतायत व जनतेचं लक्ष दुसरीकडे वळवू पहातायत.

त्यामुळे, या देशात अमानुष आर्थिक-विषमतेतून धन-संपत्तीचं केंद्रीकरण होत, असे अदानीसारखे नृशंस अब्जाधीश निर्माण होऊच नयेत... म्हणून, आम्ही किमान पातळीवरील सन्मानजनक जगण्याची हमी देण्यासारख्या, काही मूलभूत संरचना उभ्या करणार आहोत.

देशातील सर्वात मोठी समस्या म्हणजे, दलित-ओबीसी-मुस्लिम आणि आदिवासींवरील सध्या देशात सुरु असलेले अत्याचार. जातधर्म-व्यवस्थेतील अत्याचारांच्या वेदना, माझं अंतःकरण विदीर्ण करुन टाकातात. हे अत्याचार, वरच्या राजकीय फळीने उभ्या केलेल्या धोरण-संरचनेतूनच होतं असतात. पंतप्रधानांनी ठरवलं तर, दुसऱ्याच मिनिटात हे सगळं थांबू शकतं.

...पण लक्षात घ्या की, ही अत्याचारी धोरणं, एकट्यादुकट्या नरेंद्र मोदींचीच पंतप्रधान म्हणून धोरणं नसून, तो एका मोठ्या व्यापक कटाचा भाग आहे. ज्यांना, बहुसंख्यांकांवर सत्ता गाजवायचीय व त्यांचं शोषण करायचंय... अशा RSS, BLP सारख्याचं, ते 'धोरण-विशेष' आहे.

पं. नरेंद्र मोदी, जर रा. स्व. संघाला (RSS) नकोसे झाले, तर, पाचव्या मिनिटाला पंतप्रधानपदावरुन त्यांची उचलबांगडी होऊ शकते... तेव्हा, सगळा घटनाक्रम व पडद्यामागच्या हालचाली समजून घ्या!

**...इति, राहुल गांधी**

***संकलक : राजन राजे,***

***अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष***


मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...



'धर्मराज्य पक्ष'प्रणित

## 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

या कामगार संघटनेत सामील व्हा !!!







राजन राजे
(अध्यक्ष)

महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)